
कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M2233 विषय धर्मशास्त्र

नाव श्री सत्यदत्तकथा (MSS)

लेखक / लिपीकार —

पृष्ठ ९९ काळ — पूर्ण / अपूर्ण

M2883

(6)

ॐ

श्रीसत्यदत्त कथा

प्रारंभ

श्रीसत्यदत्तपूजा ॥ श्री मन्महामंगलमूर्तये नमः ॥
प्रातर्वै नद्यादिके स्नात्वा कृत्वानियमैमेवच्च ॥
कृत्वा नैमित्तिकं कार्मं कारयेत्तनिजगृहततः ॥
आचम्य प्राणायामं कृत्वा देशकालौ संकीर्त्य श्री
सत्यदत्त प्रसादेन मम सकलारिष्ट परिहर पूर्वकं वां
छितार्थसिध्यर्थं श्री सत्यदत्त प्रीत्यर्थं श्रीसत्यदत्त
व्रतं करिष्ये. ॥ तथाच्च आसनविधि पूर्वकं महागण
पति पूजनं पूर्वकं ॥ शरीर शुध्यर्थं श्रीगुरुस्मरण
वंदन पूर्वकं महागणपति पूजनं शरीर शुध्यर्थं

दत्त गायत्र्या षडंगन्यासांश्च करिष्ये ॥ तदंग कल
शाराधन शंख घंटी का पूजनं करिष्ये ॥
अपवित्रोति पूजाद्रव्याणि आत्मानं देवतार्चनस्थानं
च प्रोक्ष ॥ सर्ववर्णैः समाकीर्णे सर्वतोभद्र मंडले ॥
आव्रणं सजल कुंभ ताम्रं मृन्मयमेव च संस्थाप्य ॥
वस्त्र संवीतीन कंठदेश सुशोभितं ॥ पंचरत्न समायुक्तं
फल गंधाक्षतैर्युतम् ॥ तस्मिन्सुपल्लवैर्युक्ते ससदत्तंत्र
गद गुरुं ॥ शालग्रामं कांचननादीनिर्मितं वा यथा
विधी ॥ प्राणप्रतिष्ठां कृत्वैव साम्यक पूजनमारभेत ॥

अथ सर्वतोभद्रं तदुपरि पूजनादि आह ॥ गोमयोपलि
प्य भूमौ सर्वतोभद्रं विरच्य तत्प्रकारमाह ॥ प्रागदी
च्याग तरेखा कर्या देकोन विंशतिः ॥ खंडेदुस्त्रिप
दै कोणे शृखलापञ्चभिः पदै ॥ एकादशपदा वल्लीभ
द्रं तु नवभिः पदैः ॥ चतुर्विंशसदा वापि परिधिर्विंश
तिः पदै ॥ मध्ये षोडशाभिः कोष्टैः पद्ममष्टदलं स्मृत
म ॥ श्वेतेंदुः शृखला कृष्ण वल्ली नीलेन पूरयेत ॥
भद्रारुणासिता वापि परिधिः पीतवर्णका ॥
बाह्यातर्दलश्वेता कर्णिका पीतवर्णका ॥ परिध्या

१

श्रीगणेशायनमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयायनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

सूतउवाच ॥ यतो भूतानिजायंते येनजीवन्ति तान्युत ॥
यो ज्ञानसुखदस्तेषां महात्म्यंतस्यसूच्यते ॥

ज्या परमात्म्यापासून पंचमहाभूतें व जीवादि अखिल सृष्टी उत्पन्न झाली व तो जिचें रक्षण करतो, तसेंच जो जीवांना स्वस्वरूपाचें ज्ञान प्राप्त करुन देऊन अखिल सुख प्राप्त करुन देतो अशा परमात्म्याच्या गुणांचें-महात्म्यांचें वर्णन करतो

व्यासउवाच- लक्ष्मीर्दृष्ट्वा जनान्सर्वान्क्लिश्यमानान्स्वकर्मभिः ॥
॥ नारायणं जगन्नाथं प्रोवाच मधुरं वचः ॥

सर्व जीव आप आपल्या कर्मांत रत होऊन महान दुःख भोगीत

आहेत असें पाहून, देवी लक्ष्मी जगतप्रभू अशा नारायणास
गोड शब्दानें विचार ते कीं

रमाउवाच ॥ रमा विचारते हे प्रभो या जीवांचें दुःखनिवारण
होऊन त्यांना सुख प्राप्ती कोणत्या उपायानें होईल हें सांगा.
लक्ष्मीचें हें म्हणणें ऐकून प्रभूंचें मनांत दया उत्पन्न झाली व ते म्हणाले.

नारायणउवाच ॥ नारायण म्हणतात: सत्यदत्त नांवाचें व्रत आच
रण केल्याने जीवांचें दुःख निवारण त्वरित होऊन त्यांना सुख
प्राप्ती होईल. आतां तुला फारच मनोरम व हितकारक अशी
कथा मी सांगतो ती ऐक.

एकदां नैमिषारण्यामध्यें मोठे मोठे महर्षि देवाधिदेव जो परमा-
त्मा त्याचें, हृदयाचे ठिकाणी शांत चित्तानें ध्यान करीत बसले होते.

असें एकाग्र चित्तानें ध्यान करीत असतां परमात्म्याचा सगुण
साक्षात्कार-त्याचें सगुण रुपांत दर्शन कसें होईल. हा विचार
त्याचें मनांत आला, त्या बरोबर सर्वांना एकदम त्रिगुणात्मक
अशा विश्वरुपांचें दर्शन झालें, निरतिशयानंद सुख प्राप्ति
करुन देणारें असे ब्रह्मा-विष्णु-शिवात्मक तयांचें एकरुप तें
होतें. पूर्वी कोणी न पाहिलेलं आणि हल्लीं व पुढेंही पाहवया
स न मिळणारें असें तें विश्वरुप ह्या भूतलावर अवतरलेलें पाहून
सर्व ऋषि जनांना अत्यंत आश्चर्य वाटलें, त्यांची अंतःकरणें
प्रेमसागराच्या लाटांनी उचंबळूं लागली, व ते म्हणाले की ह्या
पृथ्वीतलावर आम्ही फार धन्य आहों, आम्ही कृतकृत झालों
व आमचें प्रारब्ध चांगलें म्हणून या रुपाचें दर्शन झालें.

४

रम्भाउवाच ॥ क्व इहानि सुख प्राप्ती एषां केन भविष्यतः ॥
॥ इत्थं रमोक्तमाकर्ण्य दययाप्राब्रवीद्वचः ॥ ३ ॥
नारयणउवाच ॥ सत्यदत्त व्रतेनाशु एतेषां ते भविष्यतः ॥
॥ अथते कथयामीष्टमितिहासं मनोरमम ॥ ४ ॥
॥ कदाचित्सुखमासीना नैमिषे ये महर्षयाः ॥
॥ देवदेवं महात्मानं चिंतयंतो हरिहृदि ॥ ५ ॥
॥ प्रार्थयामासुरव्यग्राः कथं नो दर्शनं भवेत ॥
॥ ततश्च ददृशुः सर्वे विश्वरुपं नयमियम् ॥ ६ ॥
॥ ब्रह्मों पेंद्रेश रुपंच परमानंद विग्रहं ॥
भूतं भव्यं भविष्यच्च विश्वलोकेविलावयच्च ॥ ७ ॥
मुनयो विस्मया विष्टाः प्रमानिर्भर मानसाः ॥

५

धन्यास्माः कृतकृत्यास्मः सुभगाः स्मो महीतले ॥ ८ ॥
असें म्हणून पुनःपुनः ते ऋषीवर्य भूमीवर त्या परमात्म्यास साष्टांग प्रणिपात घालूं लागले. नंतर ज्यांची सात्विकवृत्ति झाली आहे अशा मुनिजनांनी परमेश्वराचें नाना प्रकारें यथाविधि पूजन केलें. ॥ देवाधिदेव म्हणाले ॥ हे मुनि पुंगवानो या जगतितलावर तुमच्यावर कृपा करण्याकरितां मी आलो आहे असें समजा दत्तात्रेय अशा स्वरुपामध्यें मी अवतार घेऊन पृथ्वी-वर संचार करणार आहे. माझे अवतार, व त्यांतील रुपें व लीला विविध व अगाध आहेत. त्या तुम्ही सूताचे मुखांतून श्रवण करा म्हणजे अत्युत्तम अशा सुखोपभोगांचा तुम्हांस लाभ मिळेल. ॥ इत्युक्त्वा दंडवद्भूमौ नमश्चक्रुः पुनःपुनः ॥
॥ सर्वेपचारैः संपूज्य मुनयः साधुवृत्तयः ॥ ९ ॥
देवदेव उवाच ॥ जानीतमागतं विप्राः प्रसादाय भवात्स्विह ॥

॥ दत्तात्रेयः स्वरूपेण चावतीर्य चराम्यहम् ॥१०॥
॥ ममावतार रूपाणी कर्माणि विविधानि च ॥
॥ यूयं सूत मुखाच्छ्रुत्वा भुक्त्वा भोगाननुत्तमान् ॥११॥
॥ मत्प्रसादाच्च विज्ञानं प्राप्य ते मां गमिष्यथ ॥
॥ इत्युक्त्वांतर्दधे देव सहसा महसां निधिम् ॥ १२ ॥

माझ्या प्रसादाच्या योगानें तुम्हांस साक्षात्कार होइल व माझ्याप्रत तुम्ही लवकर प्राप्त व्हाल. असें बोलून तो प्रकाशरूप परमात्मा एका एकी अंतर्धान पावला.

मुनयऊचुः ॥ सूत सूत महबुद्धे सर्व शास्त्रविशारद ॥
॥ माहात्म्यं दत्त देवस्य गुण जन्मादि संश्रितम् ॥१३॥
॥ परमानंद जनन ब्रूहि नो वदतांवर ॥

परमात्म्याचे अवतार व अगाध लीला एकण्यास उत्सुक झालेले ऋषीजन म्हणतात हे महाबुद्धिमान सूता, हे सर्व शास्त्रांत

परांगत असणाऱ्या सूता, दत्त प्रभूंच्या जन्म व त्यांचें गुणवर्णनपर असें परमानंद प्राप्त करुन देणारें चरित्र हे पंडित श्रेष्ठा आम्हांस त्वरित सांग

सूतउवाच ॥ मुनयः साधु पृष्टोऽहं भवद्भिः करुणात्मभिः ॥१४॥

सूत म्हणाले - हे दयार्द्र अंतःकरणाचे ऋषिजनहो, तुह्मी मला फार उत्तम गोष्ट विचारली.

॥ माहात्म्यं दत्तदेवस्य यथा मत्युनुवर्णये
॥ ब्रह्मणा चादितः सृष्टावत्रि र्वेद विदांवरः ॥१५॥
॥ सहपत्न्या मया वृद्ध कुलाद्रिं तपसे स्थितः ॥
॥ शरणं तं प्रपद्येहं य एव जगदीश्वरः ॥१६॥

प्रभू दत्त देवांच्या चरित्राचें वर्णन मी यथामति करितों.

८

सर्व वेदविद्या पारंगतांमध्यें श्रेष्ट अशा अत्रि ऋषिंना ब्रह्मदेवानें सृष्टि उत्पन्न करण्याची प्रेरणा केली असतां, त्यांनीं पर्वत श्रेष्ठ अशा सह्य गिरीवर वृक्षातळीं आपल्या पत्नीसह (अनुसूयेसह तपश्चर्या केली. सर्व जगती तलास व्यापून असणाऱ्या ईश्वरास मी लीन भावानें शरण आहे, अशा तऱ्हेनें त्यांनीं स्तवन केलें.

॥ प्रजमम समामह्यं प्रयच्छत्विति चिंतयन् ॥
॥ ततोऽत्यंत कृपाविष्टा ब्रह्म विष्णु महेश्वरा: ॥१७॥
॥ गिरिस्थितं समागम्य यथाकामं वरं ददु: ॥
॥ जग्मस्तेच स्वकं धामं दंपत्योर्मिषतोस्तत: ॥१८॥

त्या अत्रिऋषींनीं परमेश्वराजवळ प्रार्थना केली की, तुझ्या सारखी संतति आम्हास होऊं दे. तेंव्हां अत्यंत कृपाळू होऊन

९

ब्रह्मदेव, विष्णु व शंकर त्या पर्वतावर तपश्चर्या करणाऱ्या ऋषिवर्या जवळ आले व त्यांनीं त्यांना इच्छित वर दिला आणि ते अत्रिऋषि व अनुसूया हे त्यांना पाहत असतां आप आपल्या लोकाप्रत परत गेले.

॥ सोमो बुद्ध ब्रह्मणोऽशेन दत्तो विष्णोस्तु योगवित ॥
॥ दुर्वास: शंकरस्यांतेरित्थं दत्ताद्यावातरत ॥१९॥

प्रभूंनीं अनुसूयेच्या पोटीं ब्रम्हदेवाच्या अंशानें चंद्र होऊन विष्णूचे अंशानें दत्त म्हणवून घेऊन शंकराचे अंशानें दुर्वास नावानें त्रय मूर्त्यात्मक अशा प्रकारें दत्ताचा अवतार धारण केला. ॥ सूत उवाच ॥

॥ अथ तस्यच दत्तस्यावतारें श्रृणुत द्विजा: ॥
॥ कृष्णशर्मा द्विज: काश्चित दत्त भक्ति परायण: ॥२०॥

१०

॥ श्रीगोदापारतटे स्थित्वा वेद वेदांग पारगः ॥
॥ ज्ञानं सम्यं तु मे दत्त प्रयच्छत्विति चिंतयन ॥२१॥
सूत म्हणतात - हे ऋषिवर्यांनें, आतां या दत्त अवताराच्या लीला मी तुम्हास सांगतों त्या श्रवण करा. पुर्वी एक कृष्ण नांवाचा ब्राह्मण होता व तो दत्त प्रभूंची अत्यंत भक्ति करणारा होता. तो गोदावरी नदींचे कांठी रहात होता. व सकल वेद व शास्त्रें ह्यांत पारंगत होता. त्यानें श्री दत्त प्रभूंचे चरणी प्रार्थना केली कीं, हे भगवान दत्तात्रेया, मला तुझ्या सत्स्वरुपाचें ज्ञान प्राप्त करुन दे
॥ संपूज्य प्रत्यहं दत्तं दध्यौ वर्षाणि विंशति ॥

११

॥ ततः प्रसन्नो भगवान्दत्तात्रेयो दयानिधिः ॥२२॥
॥ माधवस्यासिते पक्षे पंचाम्यांच गुरोर्दिने ॥
॥ शर्वर्याः प्रथमे यामे ह्याद्यनाडीत्रये गते ॥२३॥
॥ प्रादुर्बभुव कृपयास्वीयभक्तस्य सन्निध्यौ ॥
॥ कृष्णशर्मा दत्तदेवं परमानंद विग्रहम ॥ २४॥
तो ब्राह्मण दररोज दत्ताची नानाविध प्रकारें पूजा करीत असे. अशा प्रकारें वीस वर्षे पर्यंत सतत उपासना केल्यावर कृपासागर असे भगवान दत्तात्रेय प्रभू प्रसन्न झाले. वैशाख महिन्याचे वद्य पक्षांतील पंचमी तिथीस व गुरुवारीं रात्रीचे पहिले प्रहरामध्यें पहिल्या तीन घटका गेल्यावर

चवथ्या घटकेमध्यें आपल्या भक्तावर कृपा करण्याकरितां त्या चें घरीं श्रीदत्त देवांनीं अवतार घेतला त्यावेळीं त्या कृष्णनावा चे ब्राह्मणास अत्यंत आनंद झाला.

॥ सांद्रनीलांबदश्यामं पीतकौशेयवाससम् ॥
॥ शंखचक्राभयवर युक्त हस्तैः सुशोभितम् ॥२५॥
॥ विलोक्य विस्मयाविष्टः प्रेमनिर्भरमानसः
॥ प्रणम्य दंडवद्भूमौ नमश्चक्रे पुनः पुनः ॥२६॥

घनदाट अशा कृष्णवर्ण मेघाप्रमाणें ज्याची नीलवर्ण कांति आहे, एका हातांत शंख व दुसऱ्यांत चक्र अशीं आयुधें ज्यानें धारण केलीं आहेत, दोनहस्त अभय वरद अशा मुद्रांनीं

युक्त आहेत व ज्यानें पिवळें वस्त्र धारण केलें आहे, अशा त्या सर्वांग सुंदर दत्त प्रभूंचे मूर्तीस पाहून तो कृष्ण ब्राह्मण अत्यंत आश्चर्य चकित झाला व त्याचें अंतःकरण प्रेमाच्या भरानें उचंबळूं लागलें, त्यानें भूमीवर साष्टांग प्रणिपात घातला व पुनःपुनः तो नमस्कार करूं लागला. ॥ विशेषै रुपचारैश्च पूजां कृत्वा विधानतः ॥
॥ सपादं प्रस्थमात्रं च गोधूमस्य च चूर्णकम् ॥२७॥
॥ तावन्मानानि गोक्षीर घृतरंभाफलानि च ॥
॥ तावन्मानां शर्करां चैकीकृत्यैलादिभिः सह ॥२८॥

नंतर त्यानें विधियुक्त अशा नाना उपचारांनी म्हणजे

१४

रुद्राभिषेक, गंध फूल धूप दिप वगैरे उपचारांनीं प्रभूंची पूजा करुन गव्हाचा रवा सव्वाशेर करुन घेऊन त्या मानानें गाईचें दुध तूप केळी वसाखर घालून सांत वेलदोडे घालून व सर्व एकत्र करुन आणि नाना प्रकारचीं पक्वान्नें उत्तम प्रकारें सुग्रास अशीं तयार करुन त्यानें दत्त प्रभूस त्याचा नैवेद्य दाखविला. ॥ नानाविधानि खाद्यानि सम्यक्पक्वान्यवेदयत्
॥ भक्तबंधो दयासिंधो त्वत्पदाब्जे नमाम्यहम् ॥२९॥
॥ दयालो दत्तदेवेश त्राहि मां भवसागरात ॥
॥ इति संप्रार्थ्य देवेशं प्रणनाम पुनः पुनः ॥३०॥

१५

हे भक्तवत्सल दिनसख्या परमेश्वरा हे दयासागरा, मी तुझ्या चरणारविंदाचें ठिकाणी नमन करितो हे देवाधिदेवा कृपाळू दत्तदेवा ह्या संसाररुपीं समुद्रांतून मला पैलतीरास ने. अशा तऱ्हेनें श्रीदत्तपरमात्म्याची प्रार्थना करून वरचेवर तो ब्राह्मण नमस्कार करुं लागला.

॥ विप्रान्संपूज्य विधिवद्दक्षिणां दत्तवान्द्विजः ॥
॥ अथ तस्मै दत्तदेवो ज्ञानं सत्यं ददौ तदा ॥३१॥

ब्राम्हणांचीहि यथाविधि पूजा करुन त्याना त्यानें यथोचित दक्षिणा अर्पण केली. त्यामुळें दत्तदेवानें त्या कृष्णशर्मा ब्राह्मणास आपल्या सत्वरुपाचें ज्ञान

१६ प्राप्त करून दिलें.

॥ सत्यव्रतं सत्यपरं त्रिसत्यंसत्यस्य योनिंनिहितंचसत्ये ॥

॥ सत्यस्यसत्यमृतसत्यनेत्रं सत्यात्मकं मांखलुविद्धिसत्यं ॥३२॥

हें सत्यदत्तव्रत सत्स्वरूपाची प्राप्ति करून देणारें आहे. त्रिकालीं सत्य आहे, सतस्वरूप जें परब्रह्म याचेच ठिकाणीं सत्यस्वरूपानें अधिष्टित आहे. हे सत्य स्वरूप:जो परमात्मा त्याचेंही खरें स्वरूप म्हणजे सद्‌ब्रह्म होय सत्य जें ज्ञान नेत्र त्या योगें दिसणारें सत्य स्वरूप असें जे सद्‌ब्रह्म ते मी असे जाण. सद्‌ब्रह्माचा मला साक्षात्कार झाला,

॥ इत्थं बहुविधं ज्ञानं तस्मै सत्योऽददात् प्रभुः ॥

१७ ॥ दत्तदेव उवाच ॥ प्रीतोऽहंते द्विजश्रेष्ठ मदुपासनकर्मणा ॥३३॥

अशा तऱ्हेचें निरनिराळ्या प्रकारचें ज्ञान सत्यरूपी प्रभूंनी त्यास दिलें. नंतर दत्तप्रभू म्हणाले, हे द्विजश्रेष्ठा: माझी तूं उपासना यथायोग्य केल्यामुळें मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहे.

॥ विपन्नशः सुखप्राप्तिर्भूयाते मदनुग्रहात ॥

मम भक्तस्यते गेहे स्वर्णवृष्टिर्दिनदिने ॥ ३४ ॥

तुझें दुःख दारिद्र्य आतां नाहीसें होऊन तुला सुखाची प्राप्ति माझ्या कृपेनें होईल. तूं माझा भक्त झाला आहेस. तुझ्या घरांत रोजच्या रोज द्रव्य प्राप्ति होत जाईल. दररोज सोन्याचा पाऊस पडेल. ॥ आयुतायुश्चतेदत्तं पुत्राः पौत्रास्तथायुष: ॥

॥ शतपुरुष पर्यंतं भुक्त्वाभोगाननेकशः ॥३५॥

तुला दहा हजार वर्षें आयुष्य दिलें आहे. तुझ्या पुत्रपौत्रांना सुद्धां तितकेंच आयुष्य दिलें आहे. तुझ्या कुलांत ईश्वर पिढ्या पर्यंतचे पुरुष नाना तऱ्हेचीं सुखें उपभोगतील.

॥ ततो मां प्राप्स्यसि त्वं चेत्युक्त्वा तत्रैव संस्थितः ॥
॥ स्वभक्तानां वाञ्छितार्थान्पूर्णान्कुरुते सदा प्रभुः ॥ ३६ ॥

नंतर तुला माझी प्राप्ति होईल. असें बोलून श्रीदत्तप्रभू तेथेंच गुप्तपणें राहिले. प्रभूनीं नेहमी आपल्या भक्तांचे मनोरथ पूर्ण केलेलें आहेत.

॥ ज्ञानं सत्यं तदा दत्तं सत्यदेवेन वै ततः ॥
॥ तं देवं सत्यदत्तेति नाम प्रोचुर्मुनीश्वराः ॥ ३७ ॥

त्यावेळीं परब्रह्मस्वरुप असा जो दत्तप्रभू त्यानें आपल्या

सत्यस्वरुपाचें ज्ञान दिले म्हणून त्यावेळेपासून ऋषिवर्य त्या श्रीदत्तप्रभूस सत्यदत्त अशा नावांनीं संबोधूं लागले.

॥ ब्राह्मणैर्बान्धवैः सार्कं प्रसादं जगृहे द्विजः ॥
॥ इदमित्थं हि कर्तव्यमिति निश्चित्य मानसे ॥ ३८

त्या ब्राह्मणानें ब्राह्मण व आपलें आप्तइष्ट ह्या सहवर्तमान लगेच प्रसाद ग्रहण केला आणि हें सत्यदत्तव्रत अशा प्रकारें वरचेवर करावें असा मनाचा निश्चय केला.

॥ यदा यदा च विप्रोऽसौ भक्तिश्रद्धायुतो ह्यभूत् ॥
॥ तदा तदा गुरौ चैव पञ्चम्यां च विशेषतः ॥ ३९ ॥
॥ समुपोष्योक्तकाले वै यथाशक्ति यथाविधि ॥
व्रतं च सत्यदेवस्य चकारानंदनिर्भरः ॥ ४० ॥

ज्या ज्या वेळीं या ब्राह्मणाच्या अंतःकरणांत भक्ति व श्रद्धा उत्पन्न होइल त्या त्या वेळीं तो हें सत्यदत्तव्रत करीत असे. गुरुवार व त्या दिवशी पंचमी तिथी असल्यास फार चांगलें, अशा दिवशी उपोषण करुन योग्य कालाला यथाशक्ति व विधीपूर्वक सत्यदत्तव्रत मोठ्या आनंदयुक्त अंतःकरणानें तो करीत असे.

॥ तद्व्रतस्य प्रभावेण सत्यज्ञानसमन्वितः ॥
॥ इह सर्वं सुखं भुक्त्वा चांते सत्यपुरं ययौ ॥४१॥

या व्रताचें प्रभावानें त्यास परमेश्वराच्या सत्स्वरूपाचें ज्ञान झालें व इहलोकाचीं सर्व सुखें प्राप्त होऊन शेवटीं

त्यास मोक्ष प्राप्ति झाली

॥ अन्येपीदं व्रतं कृत्वा बहुसौख्यमवाप्नुवन ॥
॥ निर्धूत कल्मषाः सत्यदत्त भक्तिपरायणाः ॥४२॥

या प्रमाणें दुसऱ्याहि असंख्य लोकांनीं ह्या सत्यव्रताचें आचरण करुन अनंत सुख प्राप्त करुन घेतलें सत्यदत्तव्रताची उपासना करुन, अंतःकरणाचें मालिन्य नाहीसें करुन व शुध्द अंतःकरण करुन आत्मज्ञान प्राप्त करुन घेतलें.

पुराण समुच्चय सारोद्धारांतील श्रीलक्ष्मीनारायणसंवादांतील सत्यदत्त कथेचा प्रथमोध्यायः

22

सूत उवाच

॥ अतः परं प्रवक्ष्यामि येनेदं च पुराकृतम ॥

॥ तत्सम्यक्कथयिष्यामि शृण्वंतु मुनिसत्तमाः ॥ १ ॥

सुत म्हणतात - आतां हें सत्यदत्त व्रत पूर्वी कोणी केलें हें मी तुम्हांला सांगतो. ती कथा हे बुद्धिमान ऋषीनो तुम्हीं श्रवण करा.

॥ गौदातीरे पंचवट्यां ब्राह्मणो वदवित्तमः ॥

॥ नाम्ना केशवशर्मेति विख्यातोभून्महितले ॥ २ ॥

गोदावरीचे कांठी नाशिक क्षेत्रांत पंचवटी मध्यें केशव या नांवाचा ब्राह्मण रहात होता तो संपूर्ण वेद जाणणारा असून ह्या पृथ्वी तलावर फार विख्यात होता.

22

23

तस्य भार्या सुशीलासीन्नाम्ना चारुमती सती ॥

भक्त्यातिथ्यभ्यागतानां सदा पूजापरायणा ॥ ३ ॥

त्याची बायको सुशीला या नावाची होती. ती फार गोड स्वभावाची होती असून पतिव्रता होती. ती नेहमी मोठ्या भक्तिनें अतिथी व इतर पाहुणे यांचा परमर्श घेण्यांत तत्पर असे.

॥ सुषुवे सा बहून्पुत्रान्मृताः सर्वे तदैव हि ॥

॥ अतः परम दुःखार्तौ बभूतां दंपती तदा ॥

तिला पुष्कळ पुत्र झाले, पण ते सर्व मृत्यू पावले. त्यांतील एकहि जगला नाही. त्यामुळें ते नवरा बायको अत्यंत

23

शोकानें विन्हल झालें.

॥ एकस्मिन्नेव काले तु ब्राह्मणो ज्ञानिनांवरः ॥
॥ गोदायात्रा प्रसंगेन तयोर्गेहमुपागमत ॥ ५ ॥

अशा प्रकारें कांहीं दिवस गेलें असतां एकदां गोदावरीची प्रदक्षिणा करणारा एक ज्ञानसंपन्न ब्राह्मण यांचें घरी आला. ॥ दिनपंचकपर्यंतं दंपताभ्यांच सत्कृतः ॥
॥ ततः सविप्रस्संतुष्टो ज्ञात्वा दुःखं तयस्तदा ॥ ६ ॥

पांच दिवसपर्यंत त्या ब्राह्मणाचा आदरसत्कार त्या दंपतीनें केल्यामुळें तो ब्राह्मण फार संतुष्ट झाला व त्या दंपतीस होणारें दुःखाची त्यानें चौकशी केली व ते जाणून घेतलें.

॥ दययासमुवाचेदं दंपतीमधुरं वचः ॥
॥ श्रो दंपती युवासम्यक सप्तदत्तस्याहिव्रतम ॥ ७ ॥
॥ कुरुतं पर्ण भक्त्याच ध्रुवं सर्वेष्टसिद्धिदम ॥
॥ तदव्रतस्य प्रभावेण सुपुत्रा प्राप्नुतं लघु ॥ ८ ॥
॥ पूर्णायुषश्चतं सर्वे भविष्यन्ति विपश्चितः ॥
॥ श्रीमतः कीर्तिमतश्च दत्तभक्तिपरायणाः ॥ ९ ॥
॥ इत्युक्त्वा ब्राह्मण श्रेष्ठ यात्रार्थं निजगामह ॥

त्याचें दुःख श्रवण करून अंतःकरणांत कळवळा उत्पन्न झाल्यामुळें त्या दंपतीना मधुर वाणीनें तो ब्राह्मण ह्मणाला हे केशव ब्राह्मणा व हे पतिव्रते तुह्मी सप्तदत्तव्रत मोठ्या भक्तिनें व श्रद्धायुक्त अंतःकरणानें करा.

२५

म्हणजे तुमचें सर्व मनोरथ तात्काळ परीपूर्ण होतील. या व्रताचे प्रभावानें तुह्मांस उत्तम अशी पुत्रसंतती प्राप्त होईल. ते सर्व पुर्णायुषी ज्ञानी. श्रीमान् व किर्तीमान होऊन दत्तभक्ति परायण होतील. असें बोलून तो विप्रश्रेष्ठ याले करितां निघून गेला.

॥ ततः केशवशर्माऽसौ सभार्यो भक्तिसंयुतः ॥१०॥
॥ पूर्वोक्तविधिना सम्यग्यथाशक्ति यथाविधि ॥
॥ सप्तदत्तं व्रतं चक्रे यथाकालमतंद्रितः ॥११॥
॥ पूजां कृत्वा प्रसादं च सभार्योऽग्रहीन्मुदा ॥

नंतर या केशव नामक ब्राह्मणानें आपल्या पत्नीसह वर्तमान श्रीसप्तदत्त व्रत मोठ्या भक्तियुक्त अंतःकर

२५

२६

णानें पूर्वी सांगितलेल्या विधि प्रमाणें यथाशक्ति व शास्त्रोक्त पद्धतिनें उचित कालास व वारास निरलसपणें केलें सप्त दत्ताची उत्तम प्रकारें पूजा करुन आपल्या भार्येसह त्यानें मोठ्या आनंदानें प्रसाद ग्रहण केला.

॥ तद्व्रतस्य प्रभावेण पूर्वोक्त गुणसंयुतान् ॥१२॥
॥ सुपुत्रान्दशसंख्याकान्प्रापसर्वांश्च संपदः ॥
॥ पुत्रसंबंधि सौख्यं च ज्ञानं संप्राप्य मुक्तिदम् ॥१३॥
॥ इह सर्व सुखं भुक्त्वाऽन्ते दत्तपुरं ययौ ॥
॥ एतत्सुतादयोऽपीदं व्रतं कृत्वा यथाविधि ॥ १४॥
॥ पुत्रादि संपत्सौख्यं च भुक्त्वा दत्तपुरं ययुः ॥
॥ एवं हि तत्कुलं सर्वं सुखमापनिरंतरम् ॥१५॥

२६

२८

या व्रताच्या प्रभावानें पूर्वी सांगितलेल्या गुणांनीं युक्त असे
दहा पुत्र त्यास झाले. त्यांस पुष्कळ प्रकारें संपत्ती मिळाली
पुत्रांसंबंधी जे जे सौख्य मिळावयाचें तें सर्व मिळालें मोक्ष
प्राप्तीचें ज्ञान प्राप्त होऊन इहलोकच्या सर्व सुखांचा
त्यानें उपभोग घेतला व अंतकालाचें वेळीं तो दत्ताचें
निवासस्थानीं ह्मणजे मोक्षास गेला. या प्रमाणें त्याचें
मुलांनींहि यथाविधि सत्यदत्तव्रताचे आचरण करून
संतती संपत्ती व ऐश्वर्याचा उपभोग घेऊन परलोक
प्राप्ति करून घेतली याप्रमाणें त्या सर्व घराण्यास
सत्यदत्तव्रताचें योगें सर्व सुखाची निरंतर प्राप्ति झाली. २८
श्री लक्ष्मी नारायण संवादे सत्यदत्त कथायां द्वितीयोध्यायः

२९

॥ अध्याय तिसरा, ॥

मुनयु वाच ॥ सूत त्वद्वदनांभोजात्कथां चित्रां व्रताश्रयाम् ॥
॥ श्रृण्वंतो नहितृप्तास्मः पियषमेवमानवाः ॥१॥
ऋषी ह्मणाले: हे सूता, ज्या प्रमाणें मनुष्यांना अमृतप्राशन
वारंवार करावेसे वाटते त्या प्रमाणें तुझ्या मुखकमलातून
व्रतसंबंधी आश्चर्यकारक कथा ऐकत असता आमची तृप्ती
होत नाहीं तर त्या कथा पुनःपुनः ऐकाव्याशा वाटतात.
सूतउवाच ॥ सुचरितं सत्यदत्तस्य सर्वेषांच सुखप्रदम् ॥
॥ पुनस्त्वसंप्रवक्ष्यामि श्रृण्वंतु मुनिपुंगवाः ॥२॥
सूत ह्मणाले: हे ऋषिवर्य, हो सर्वांना सुखप्रद असें सत्यदत्ताचें च-
रित्र पुनः मी सांगतो तें तुह्मी श्रवण करा. २९

३०

॥ पुरूरवःपुत्र असीदायुर्नाम पृथ्विक्षितीश्वरः॥.
॥ एक छत्रेण चक्रे सराज्यं भूपतिसत्तमः ॥ ३॥
पूर्वी सर्व पृथ्वीचें एकटा राज्य करणारा असा पुरूरव्याचा पुत्र आयु या नावाचा राजा होऊन गेला. तो त्या कालच्या सर्व राजांमध्यें श्रेष्ठ असा होता.
॥ पुत्रं नविंदते राजा तेन दुःखी व्यजायत ॥
॥ चिंतयामास धर्मात्मा कथं मे जायते सुतः ॥ ४॥
पुत्र प्राप्ति न झाल्यामुळें राजा आयुला फार दुःख झालें तो धर्मानें वागणारा असल्यामुळें विचार करूं लागला कीं काय केलें असतां मला पुत्राची प्राप्ती होईल.

३०

३१

॥ इति संचिंत्य पुत्रार्थं कर्मजातं चकार ह ॥
॥ एकदा गुरु माहूय शौनकं समुवाच ह ॥ ५॥
॥ कर्मणा केन मे पुत्रो भविष्यति गुणान्वितः॥
॥ तत्कर्म ब्रूहि शीघ्रं मे सर्वज्ञ मुनिसत्तम ॥ ६॥
या प्रमाणें विचार करून पुत्र होण्या करितां त्यानें पुष्कळ प्रकारची कर्मे केली. पण फलप्राप्ति न झाल्यामुळें त्यानें एकदां आपल्या शौनक नामक गुरुस बोलावुन आणून विचारलें कीं हे त्रिकालज्ञानी मुनिश्रेष्ठ गुरो कोणत्या कर्माच्या योगानें मला सर्वगुण संपन्न असा मुलगा होईल. तें कर्म तुम्ही मला सत्वर कथन करा.

३१

३२ शौनकं उवाच ॥ राजेंद्र सत्यदत्तस्य व्रतं करु यथाविधि ॥
॥ तद्व्रतस्य प्रभावेण सुपतं प्राप्स्यसि ध्रुवम् ॥ ७ ॥
असा राजाचा प्रश्न ऐकून शौनक म्हणाले हे राजेंद्र, सत्यदत्ताचें यथाविधि व्रत तूं कर म्हणजे त्या व्रताच्या प्रभावानें तुला निश्चयानें सुपुत्र प्राप्त होईल.
॥ गुरुवाक्यं समाकर्ण्य स तुष्टश्च महीपतिः ॥
॥ इदमप्येकमस्तीति पुत्रप्राप्तौ हि साधनम् ॥ ८ ॥
॥ मत्वा स सत्यदत्तस्य व्रतं चक्रे यथाविधि ॥
॥ प्रसादं जगृहे भक्त्या भार्याबंधुजनैस्सह ॥ ९ ॥
गुरुचें भाषण श्रवण करुन नृपश्रेष्ठ आयुराजा संतुष्ट झाला. पुत्रप्राप्तीस्तव हे सत्यदत्त व्रतरूपी एकच साधन आहे, ३२

३३ असें मानून त्या आयुराजानें सत्यदत्तचें व्रत यथाविधि केले आणि पत्नि व बंधुजनासह भक्तीनें प्रसाद ग्रहण केला.
॥ अथा चिरणकालेन आयु पत्नी महासती ॥
॥ सत्यदत्त प्रसादेन दिव्यतेजः समन्वितम् ॥ १० ॥
॥ गर्भं संप्राप्य सानंदं विपुलं पायस प्रिया ॥
नंतर थोड्या दिवसांनी महान पतिव्रता अशा आयुराजाच्या इंदुमती नामक कांतेला श्रीसत्यदत्ताचें प्रसादानें अतिशय तेजस्वी असा गर्भ राहिला व त्या योगे अत्यंत कल्याणरूपी अमृताची इच्छा करणाऱ्या त्या राणीला आनंद झाला.
॥ एतस्मिन्नेव कालेतु हुंडाख्योदानवाधमः ॥ ११ ॥
शुश्रुवान्नंदनवने चारणानां परस्परम्
आयोर्गर्भे महावीर्यो विष्णुतुल्यपरा[illegible]क्रमम् ॥ १२ ॥ ३३

३४

॥ भविष्यति सुतश्रेष्ठो हुंडस्यांतं करिष्यति ॥
॥ एवंविधं महाद्वाक्यमप्रियं दुःखदायकम् ॥१३॥
॥ समाकर्ण्यच तन्नाशे बहु [illegible] यत्नं चकार ह ॥
॥ एव हुंड यत्तमाने बहुं कालो जगाम ह ॥१४॥

ह्याच वेळीं नंदनवनामध्ये चारण आपसांत बोलत होतें कीं, आयुराजाच्या गर्भाचे ठिकाणीं अमित विर्यवान व श्रीविष्णु सारखा पराक्रमी असा श्रेष्ठ पुत्र होईल. आणि तो दानवाधम हुंडाचा नाश करिल, या प्रकाराचें व अप्रिय असें भीतिप्रद शब्द असुरांमध्यें दुष्ट अशा हुंड नामक राक्षसानें (अपल्या मुलीकडून) श्रवण करुन त्याच्या नाशास्तव अनेक प्रकारचें त्यानें प्रयत्न केलें. याप्रमाणें हुंडासूर यत्न करीत असतां पुष्कळ काळ लोटला.

३४

३५

॥ तदाराज्ञ्या मायपत्नी सुषुवे पुत्रमुत्तमम् ॥
॥ तेजसाऽलीवसो भाति यथा सूर्यो नभस्थले ॥१५॥

इकडे योग्य काळीं रात्रीच्या समयी आयुराजाच्या पत्नीला सर्वांग सुंदर पुत्र झाला तो पुत्र आकाशांत सूर्य शोभ तो त्या प्रमाणे अत्यंत तेजानें शोभूं लागला.

॥ काचिद्दासी बहिर्गत्वा हर्षेणान्यां तदाब्रवीत ॥
॥ तस्यः सर्व समाज्ञाय हुंडाख्यो दानवाधमः ॥१६॥
॥ दास्या अंगे प्रविश्यैनं प्रविष्टश्चायुमंदिरे ॥
॥ महाजने प्रसुप्ते च निद्रयातीव मोहिते ॥१७॥
॥ तं पुत्रं देव गर्भा ममपहृत्या बहिर्गतः ॥
॥ कांच नाख्य पुरं प्राप स्वकीयं दानवाधमः ॥१८॥

कोणी एका दासीनें सूतिकागृहातून बाहेर येऊन दुसऱ्या

३५

दासींला आनंदानें ही पुत्रवार्ता सांगितली. तिचे सर्व बोलणें ऐकून अत्यंत दुष्ट अशा हुंडासुरानें माया लाघवानें दासीचें शरीरांत प्रवेश करुन आयुराजाच्या प्रसूतीगृहांत प्रवेश केला. यानें योग मायेचा प्रयोग केला व त्या योगे रक्षण करणारे पाहारेकरी वगैरे लोक निद्रातिशयामुळें मोहित होऊन गाढ झोपी गेले आहेत असें पाहून ब्रह्मदेवाप्रमाणें तेजस्वी अशा त्या मुलाला हरण करुन तों दुष्ट दैत्य बाहेर आला आणि स्वतः च्या कांचन नामक नगरामध्ये गेला.

सूत उवाच ॥ अथापश्यं त्सायुर्भार्या तदा तं बालकोत्तमम् ॥
॥ हाहाकारं महत्कृत्वा रुरोद करुणान्वितम् ॥१९॥

सूत सांगतात - हे ऋषिहो नंतर ती आयुराजाची पत्नी आपला

सुंदर पुत्र नाहीसा झाला असें पाहून करुणस्वरानें मोठ्यानें आक्रोश करुन रुदन करुं लागली.

॥ सत्यदत्तेन दत्तस्तु पुत्रः केन कथं हृतः ॥
॥ हा पुत्र वत्स मे तात हा बालगुणमंदिर ॥२०
॥ केन त्वमपनीतोसि मम प्राणैः समन्वितः
॥ इत्थं शोकात्सेंदुमती मूर्छिताविह्वलापतत् ॥२१॥

श्रीसत्यदत्तानें दिलेला माझा मुलगा कोणि कसा नेला, हे पुत्रा माझ्या बाळा लाडक्या सद्गुणालया बाळा, अशाप्रकारें- च्या भयंकर आक्रोशामुळें माझा केवळ प्राणच अशा तुला कोणी कसा रे नेला, राणी इंदुमती शोकामुळें विव्हळ होऊन निश्चेष्टित अशी भूमिवर पडली.

३८

॥ आयुराजस्तु शोकेन दुःखेन महतान्वितः ॥
॥ बालं श्रुत्वा हतं तं तु चौर्यं तथाज पार्थिवः ॥ २२ ॥
आपला पुत्र नाहिसा झाला असें ऐकून आयुराजानें सुद्धां पुष्कळ शोक केला. त्यास असंत दुःख झालें व तो गलितधैर्य झाला ॥ दत्तदत्तस्य पुत्रस्य कथं विघ्नोह्यजायत ॥
॥ इति चिंतापरो राजा प्रारुरद्दुःखितो भृशम् ॥ २३ ॥
दत्तप्रभूनें दिलेल्या पुत्राला कसें विघ्न उत्पन्न झालें, कारण ईश्वर संरक्षिताला विघ्नाचें भय नाहीं असें असतां हें विघ्न कां उत्पन्न झालें या प्रमाणें चिंतातुर होत्साता आयुराजानें दुःखपूर्ण होऊन फार वेळ शोक केला.
॥ अथायुं नारदो साक्षादागत्य समभाषत ॥
॥ राजंस्त्वं सत्यदत्तस्य व्रतं वै मुख्यसाधनम् ॥ २४ ॥

३८

३९

॥ असत्वाच कृपतादि्द्धि विद्धि शोकस्य कारणम् ॥
॥ तस्मत्वं सर्वदा विद्धि व्रतं वै मुख्य साधनम् ॥ २५ ॥
नंतर नारद साक्षात त्या ठिकाणी येऊन आयुराजाला ह्मणालें कीं हे राजन तूं विघ्ननाशाचें मुख्य साधन जें सत्यदत्त व्रत तें न मानून त्याची अवहेलना केलीस हेंच तुझ्या शोकाचें कारण आहे म्हणून नेहमी सत्यदत्त व्रत हेच विघ्ननाशाचें मुख्य साधन आहे असें तूं जाण
॥ तेन सर्वेष्टसिद्धिस्स्यादिति मे निश्चितं वचः ॥
॥ पुत्रापहरणं तेऽद्य क्षेमं ज्ञात्वा तु माशुचः ॥ २६ ॥
या व्रताच्या योगानें सर्व मनोरथ प्राप्त होतील असें माझें निश्चयपूर्वक सांगणें आहे तुझा नाहिंसा झालेला मुलगा

३९

४०

चांगल्या ठिकाणीं सुखरूप आहे हे मी तुला आत्ता सांगतों यावर विश्वास ठेवून तूं आतां शोक करूं नकों.

॥ सर्वज्ञः सगुणो भूत्वा महावीर्यो महाबलः

॥ येनाप्येपहृतस्तं वै हत्वा त्वां सख्यमेष्यति ॥ २७ ॥

तो पुत्र सद्गुणी ज्ञानी अतिवीर्यवान व बलशाली होऊन ज्यानें त्याला हरण केलें त्याला मारून तुझ्याकडे तो सुखरूप येईल ॥ एवमुक्त्वाचायुराजं जगाम ऋषिपुंगवः ॥

॥ गते तस्मिन्नायुराजो पत्न्यै सर्वं न्यवेदयत् ॥ २८ ॥

या प्रमाणें आयुराजाशीं बोलून ऋषिश्रेष्ठ नारद तेथून निघुन गेले. ते गेल्यानंतर आयुराजानें तें सर्व वर्तमान आपल्या पत्नीला सांगितलें.

४०

४१

॥ दत्तेन दत्तोयः पुत्रः कुशल्यास्ते स सर्वदा ॥

॥ इत्याह नारदो भद्रे प्राकृथा शोकमेवच ॥ २९ ॥

श्रीसत्यदत्तानें दिलेला पुत्र सर्वथैव सुखरूप आहे असें नारद ऋषिनीं सांगितलें म्हणून हें कल्याणी, तूं आतां शोक करू नकोस.

॥ एवमुक्ता सेंदुमती विरराम सुखान्विता ॥

॥ सत्यदत्तव्रतं चक्रे प्रावृद्ध प्रमवंच्यना ॥ ३०

अशा तऱ्हेचें राजाचें भाषण ऐकून इंदुमतीला समाधान झालें व तिनें शोक आवरला नंतर मुलावरील प्रेमामुळें तिनें सत्यदत्त व्रत केलें.

४१

४२

॥ नमोस्तु तस्मै परि सिद्धिदाय श्रीसत्यदत्ताय महात्मनेच ॥
॥ यस्य प्रसादेन मयासुपुत्रः प्राप्तः सुधीर सुगुणः सुपुण्यः ॥३१॥
ज्याच्या प्रसादानें मला धैर्यवान सर्व गुणसंपन्न व पुण्यवान असा सत्पुत्र प्राप्त झाला त्या महात्म्या सिद्धिदायक श्रीसत्य दत्ताला माझा नमस्कार असो असें ह्मणून तिनें नमस्कार केला

सूतउवाच

॥ अथ हुंडो हृतं बालं सूद हस्ते तदाददै ॥
॥ हत्वा सूद इमं बालं मत्सु भोजनहेतवे ॥ ३२॥
॥ नाना भेदैर्विभेदैश्च पचस्वैनं रिपुंमम ॥
॥ सूदोपि शस्त्र मधम्य हतवान्बालकं तदा ॥ ३३॥
सूत ह्मणतात- हे ऋषिहो, नंतर हुंडासुरानें हरण केलेल्या

४२

४४
२०

पाहून त्या वाटलें की हा बालक माझा हातून मरण्यास योग्य नाही.

॥ पुनः पुनः समालोक्य परयाकृपयान्वितः ॥
॥ वसिष्ठस्य आश्रमे पुण्ये सैरंध्रपुण्यकर्मणा ॥ ३५॥
॥ आश्रे पर्णकुटी द्वारे स्थापयामास बालकम् ॥
वारंवार त्यानें बालका कडे पाहिलें मुलाचे आईनें केलेल्या सत्यदत्त व्रताच्या पुण्याईनें त्याचे अंतःकरणात असंत दया उत्पन्न झाली नंतर त्यानें सैरंध्री कडून पुण्यकारक अशा वसिष्ठ ऋषिचें आश्रमामध्यें पर्णकुटीचें दारांत त्यास ठेविलें.

४४
२०

४५
४३

ह्या बालकाला त्या वेळीं आपल्या बल्लुवाच्या हातीं दिलें आणि त्याला सांगितलें कीं हे बल्लुवा माझ्या उत्कृष्ट भोजनाकरितां हें बालक मारून पाकशास्त्रानुसार अनेक तऱ्हतऱ्हेची पक्वान्नें तयार कर. तें भाषण श्रवण केल्यावर बल्लुवानें शस्त्र उगारलें व ह्या बालकाचा वध करण्यास तो प्रवृत्त झाला.

॥ एकाल च तदा हस्तं बालकश्च जहासह ॥

॥ अदृश्यं प्राहृश्यैव नैव वध्योमयाशिशुः ॥३४॥

तेव्हां त्याच्या हातांतील शस्त्र गळून पडलें त्याबरोबर तो बालक हसूं लागला ही फार आश्चर्य युक्त गोष्ट

४५

४३

४५

अन्यन्मांसंच सुदेन सुपक्वं च तदेवाहि ॥३५॥

तच्च श्रुत्वा स दैत्येंद्रो हुंडा हृष्टोऽभवत्तदा ॥

त्याच वेळीं बल्लुवानें दुसऱ्या प्राण्याच्या मांसाचें उत्तम पक्वान्न तयार केलें व तें मुलाचे मांसाचेंच पक्वान्न असल्याचें सांगितलें ते एकून त्या दैत्य श्रेष्ठ हुंडासुराला फार आनंद झाला.

सूत उवाच ॥ प्रातःपर्णकुटीद्वारे स्थापितं बालमुत्तमम् ॥३६॥

॥ दिव्यलक्षणसंयुक्तमपश्यन्मुनिपुंगवः ॥

वसिष्ठः सतु धर्मात्मा ज्ञानेनालोक्यबालकम् ॥३७॥

सूत म्हणतात - प्रातःकाळीं पर्णकुटीचें द्वारांत ठेविलेलें दिव्य लक्षणांनीं युक्त असें सुंदर बालक मुनिश्रेष्ठ वसि

४५

४६

षिंनी पाहिलें व आपल्या अंतर्ज्ञानानं हा बालक कोण आहे हें त्या धर्मात्म्यानें जाणलें.

।। आयुपुत्रं समाज्ञाय चारित्रेण समन्वितम् ।।
।। कृपया ब्रह्मपुत्रस्तु समुत्थाप्य सुबालकम् ।।३९।।
।। कराभ्यामथ गृह्णाति यावद्विजवरोत्तमः ।।
।। तावत्सुपुष्प वृष्टिं च चक्रु र्देवाः सुतोपरि ।।४०।।

अत्यंत उज्वल चरित्रानें युक्त अशा आयुराजाचा हा सुत आहे असें जाणून कृपेने ब्रह्मपुत्र वसिष्ठांनीं त्या सुकुमार बालकास उचलून घेतलें तो बाल जेव्हां द्विजश्रेष्ठांनी हातांत घेतला त्यावेळी त्या बालकावर देवांनीं

४६

४७

पुष्पवृष्टि केली.

।। वसिष्ठस्तं समालोक्य वरं वै दत्तवान्तदा ।।
।। नहुषेतिच ते नाम स्यात् लोके भविष्यति ।।४१।।

ते पाहून वसिष्ठांनी सुद्धां त्या बालकाला त्यावेळी वर दिला कीं तूं नहुष या नांवानेंच लोकांमध्यें प्रसिद्ध होशील.

।। हृषितं नैव केनापि बालभावेन भूमिप ।।
।। तस्मान्नहुष ते नाम लोके पूज्यं भविष्यति ।।४२।।

हे बालराजा कोणत्याही बालभावांनीं तूं आनंदित होत नाहीस म्हणून तुझें नहुष या नांवानी लोकांमध्यें पूज्य होईल.

४७

४८

॥ जातकर्माणि संस्कारान तस्यचक्रेद्विजोत्तमः ॥
॥ वेदशास्त्रादिकं सर्वंप्रवगसद्विजोत्तमात्त ॥४३॥
॥ वसिष्ठाच्च धनुर्वेद सरहस्यं महामतिः ॥
॥ एवं स सर्वनिष्पन्नो ▬ नहुषश्चातिसुंदरः ॥४४॥
॥ वसिष्ठस्य प्रसादाश्च चापबाणधरोऽभवत ॥

या मुलाचें जातकर्मादि सर्व संस्कार वसिष्ठांनी केलें तो महाबुद्धिवान बालक चांगल्या ब्राम्हण गुरुपासून वेद शास्त्रादि सर्व विद्या शिकला आणि वसिष्ठापासून धनुर्वेद सर्व रहस्यासह शिकला. या प्रमाणें तो अतिसुंदर नहुष सर्वविद्यांमध्यें निष्णात होऊन वसिष्ठाचें कृपाप्रसादानें

४८

४९

चापबाण धारण करणारा असा रणधीर झाला,

सूतउवाच ॥इदानीमप्यायुराजोसत्सदत्तस्यवैव्रतम ॥४५॥
॥ पूर्णभक्त्या पु ▬ नश्चक्रे नारदोक्तमनुस्मरन
॥ तद्व्रतस्य प्रभावेणपेरितो मुनिपुंगवः ॥४६॥
॥ नहुषं तं समाहूय इदं वचनमब्रवीत ॥

सूत ह्मणतात - हे ऋषीहो त्याचवेळीं इकडे आयुराजानें श्रीसत्सदत्ताचें व्रत नारदांनीं सांगितलेल्या गोष्टीचें स्मरण ठेवून पूर्णभक्तीनें केलें. त्या व्रताच्या प्रभावानें त्या ऋषी श्रेष्ठ वसिष्ठांस प्रेरणा होऊन त्यांनीं नहुषास हाक मारिली व ते म्हणाले कीं,

४९

५०

वसिष्ठ उवाच ॥ आयुराजस्तव पिता माता चेंदुमती सती ॥४७॥

॥ तयोः पुत्रस्त्वं नहुषं सोमवंशस्य भूषणम् ॥

॥ चारणानां भाषणेन त्वत्तो मृत्यु भयादितः ॥४८॥

॥ हुंडो दैत्यो ऽपाहरत्वां सूदहस्ते तदा ददौ

॥ शस्त्रं सूदस्य ते हन्तुर्विशीर्णं समभूत्तदा ॥४९॥

॥ दास्या दयालुः सूदस्त्वां मामाश्रमे न्यवेशयत ॥

वसिष्ठ ह्मणतात - तझा पिता आयुराजा आणि माता पतिव्रता इंदुमतीराणी आहे या दोघांचा पुत्र सोमवंशाचें केवळ भूषण असा तूं नहुष आहेस चारणांचें भाषण समजल्यामुळें तुझ्या

५०

५१

हातून आपला मृत्यु आहे ह्या भीतीमुळें हुंडासुरानें तुला हरण करून त्यावेळीं बल्लवाच्या हातीं दिलें. बल्लवाचें शस्त्र तुला मारण्याचे वेळीं गळून पडलें त्यावेळी. बल्लवाचे अंतःकरणांत दया उत्पन्न होऊन त्यानें दासी कडून तुला माझ्या आश्रमात ठेवविलें

॥ इत्यादि मुनिना सर्वमाख्यातं नहुषं प्रति ॥५०॥

॥ इतो गत्वा प्रपश्यस्व गंगातिरे महाबलम् ॥

॥ जहितं पाप कर्तारं हुंडाख्यं दानवाधमम् ॥५१॥

या प्रमाणें वसिष्ठ ऋषीनीं त्या नहुषाला सर्व पूर्वीची हकीकत माहीत करून दिली; आणि असें सांगितलें कीं, आतां येथून तूं श्रीगंगातटाकी

५१

५२

जाऊन मोठा बलिष्ठ, पापकर्मी व असुरांमध्यें नीच, अशा हुंड नामक राक्षसास मार.

॥ इति चामाष्य नहुषं विरराम महामतिः ॥
॥ आमंत्र्य च मुनीन्सर्वान् हुंडं गंतुं मनो दधे ॥५२॥

असे नहुषाला बोलून महाबुद्धिवान् वसिष्ठ मुनी गप्प बसले. नंतर सर्व ऋषींचा विचार घेऊन हुंडा सुराकडे जाण्याचें नहुषानें मनांत आणिलें.

॥ आशिर्वादं च ते चक्रुरायुपुत्रं महाबलम् ॥
॥ आकाशे देवताः सर्वाः नेदुर्वै दुंदुभी मुदा ॥५३॥

५२

५३

॥ पुष्पवृष्टिं प्रच क्रुस्ता नहुषस्य च मूर्धनि ॥
॥ अत्र विष्ण्वादयो देवाः पूर्णानंदाः समागताः ॥५४॥

त्या सर्व ऋषींनीं बलवान् आयुपुत्र नहुषाला आशिर्वाद दिले. त्याचप्रमाणें आकाशांत आनंदानें सर्व देव दुंदुभि वाजवूं लागले आणि देवतांनीं नहुषाच्या मस्तकावर पुष्पवर्षाव केला। नंतर विष्णु आदिकरून सर्व देव अत्यंत आनंदयुक्त होऊन तेथें आले.

॥ शस्त्राण्यस्त्राणि दिव्यानी ददुस्तस्मै महोजसे ॥
॥ स्यंदनं च ददा विंद्रःसाश्वं सारथिना युतम् ॥५५॥

त्यांनीं अतुल पराक्रमी नहुषाला अत्यंत तेजस्वी शस्त्रास्त्रें दिलीं आणि इंद्रानें घोडे व सारथी यांसह वर्तमान रथ दिला.

५३

५४

॥ स आरुह्य रथं दिव्यं भास्वरं रत्नमालिनम् ॥
॥ जगाम नहुषः शीघ्रं यत्रास्ते दानवाधमः ॥५६॥

त्या रत्नजडित, तेजस्वी व प्रकाशमान रथावर तो नहुष आरोहण करुण जेथें तो हुंडासुर होता तेथें अतिजलद गेला.

॥ प्रविवेश महावीरो वनमध्ये सरित्तटे ॥
॥ तत्र तारुण्यसंयुक्ता दिव्यनार्यः समागताः ॥५७॥

तो पराक्रमी नहुष वनामध्यें शिरला व नदीच्या तीरावर प्राप्त झाला. तेथें तारुण्यांनी युक्त अशा दिव्यांगना त्याच्या पुढें आल्या.

५४

५५

॥ गंधर्व गीत तत्वज्ञा जगुर्गीतैं नृपोत्तमम् ॥
॥ अथ गतरिपुं हुंडः सक्रोधमिदमब्रवीत् ॥५८॥
॥ सत्वरं गच्छ दुष्टात्मन यदि जीवितुमिच्छसि ॥

त्या गंधर्वा प्रमाणें सुस्वर गाणाऱ्या स्त्रियांनीं गीतांनीं नृपश्रेष्ठ नहुषाचें वर्णन केलें नंतर हा आपला शत्रु येथें आला आहे असें पाहून, हुंडासूर साला क्रोधानें म्हणाला हे दुष्टा जर तूं जगण्याची इच्छा करीत असशील तर ताबडतोब निघून जा.

५५

॥ नहुष उवाच ॥ योऽहमादौ हृतो बालस्त्वया पः सूतिकागृहात ॥५९॥
॥ वधार्थं तव दुष्टात्मन्सोऽहमत्र समागतः ॥

हे भाषण ऐकून नहूष म्हणतो:- हे असुरा, पूर्वी सूतिकागृहांतून जो बालक तूं हरण केलास तोच मी. तुझ्या वधाकरितां हे दुष्टा, मी येथें आलो आहे.

॥ विज्ञाय तु हृतं बालं कथं जीवितवानयम् ॥६०॥

॥ इत्यादि हुंडः सुदं च पपृच्छ च पुनः पुनः ॥

॥ भार्यादासीं तथा पृष्ट्वा सापीनष्टं न्यवेदयत् ॥६१॥

हे सर्व ऐकतांच आपण हरण केलेला मुलगा कसा जिवंत राहिला वगैरे वृत्तांत हुंडासुरानें बल्लवाला वारंवार विचारला. त्याप्रमाणें आपल्या भार्येच्या दासीला तसेंच विचारलें; पण तिनें सुद्धां तो बालक नाहीसा केला असें सांगितलें.

५६

॥ यद्येवं तर्हि वै दैवं प्रतिकूलं प्रतीयते ॥

॥ इत्युक्त्वा रथमारुह्य ससैन्यो योद्धुमाययौ ॥६२॥

जर यांच्या सांगण्याप्रमाणें तो बालक नष्ट झाला असेल तर आपले दैवच अद्यापही प्रतिकूल आहे असें दिसतें. असें बोलून रथारूढ होऊन हुंडासुर सैन्यासह युद्ध करण्यास आला.

॥ तस्य ते सैनिकाः सर्वे शरशस्त्रादिभिस्तदा ॥

॥ युयुधुः संयुगे तेन नहुषेण महात्मना ॥६३॥

त्याचें तें सर्व सैन्य त्यावेळीं धनुर्बाण व तीक्ष्ण शस्त्रांनी युक्त होऊन पराक्रमी नहुषा बरोबर रणांगणामध्यें युद्ध करूं लागलें.

५८

५८

॥ ततस्त्वसौ संयति राजमानः ॥
॥ समुन्नतश्चापधरः सराजा ॥
॥ दत्तप्रसादादसुरान्मदोत्कटान् ॥
॥ नमाशयत् बाणवरैस्सुतीक्ष्णैः ॥६४॥

नंतर समरांगणांत शोभणारा वज्यानें आपलें धनुष्य बाण लावून सज्ज केलें आहे अशा राजानें नहुषानें श्रीदत्तप्रसादामुळें अती तीक्ष्ण बाणांनीं प्रदोन्मत राक्षसांचा समरांगणांत नाश केला.

॥ ततश्चुक्रोध हुंडः सोऽब्रवीत्तं नृपनंदनम् ॥
॥ अद्यैव त्वां हि नेष्यामि आयुपत्र यमांतिकम् ॥६५॥ ५८

५९

असुरांचा नाश केला म्हणून हुंडासूर अतिसंतप्त झाला तो त्या राजपुत्र नहुषास म्हणाला कीं हे आयुपत्रा आजच तुलाहि मी यमसदनास नेईन.

नहुष उवाच ॥ अहं तु त्वां हनिष्यामि इदानीं पापचेतसम् ॥
॥ इत्युक्त्वा सारथिं दिव्यमातालिवाक्यमब्रवीत् ॥६६॥
॥ वाहयतु रथं मेऽद्य भवानंहं ऽस्य संमुखम् ॥
॥ इत्युक्तो मातलिस्तेन बोधयामास वाजिनः ॥६७॥

नहुष म्हणाला- मीहि आतांच पापात्मा जो तूं त्या तुला ठार मारीन असें बोलून तो आपल्या मातलि नामक तेजस्वी सारथ्याला म्हणाला कीं आज माझा रथ हुंडासुराच्या समोर ने हे ऐकतांच मातलीनें घोड्यांना इशारा केला. ५९

॥ उत्पेतुश्च तदा वाहाः हंसा इव तदांबरे ॥
॥ आयुपुत्रो रथस्थश्च सूर्यवद्धि विराजते ॥६८॥

तेव्हां त्याचे रथाचे घोडे हंसाप्रमाणें आकाश मार्गानें धावूं लागले रथात बसलेला आयुपुत्र नहुष सूर्याप्रमाणें शोभूं लागला.

॥ अथ हुंडा रथस्थोऽपि राजते स्वस्य तेजसाः ॥
॥ उभयोर्वीरयोर्युद्धं देवाविस्मयकारकम् ॥६९॥

इकडे रथामध्यें बसलेला हुंडासूर सुद्धां स्वतःच्या तेजानें शोभूं लागला. उभयतां वीरांचे युद्ध देवांना सुद्धां आश्चर्यकारक असें झालें

॥ तदा चासिन्महन्माह्नान्दारुणं भीतिकारकम् ॥
॥ सायकैः पंचभिर्राज्ञा विद्धो हुंडः पपात ह ॥ ७० ॥

तेव्हां मोठमोठ्या वीरांना सुद्धां ते युद्ध अति भयंकर व कठीण असें वाटलें. युद्धांत पांच बाणांनीं राजा नहुषानें हुंडासुराला वेधून भूमीवर पडला.

॥ गदामुद्यम्य राजानं वेगेनैवाभ्यधावत ॥
॥ नहुषस्तीक्ष्ण खड्गेन तस्य बाहु निचिच्छिदे ॥७१॥

पुनः उठून हुंडासूर गदा घेऊन राजावर अति वेगानें धावत आला. तेव्हां नहुषानें त्याचे दोन्ही बाहू तीक्ष्ण तरवारीनें तोडिलें.

॥ ततो महारवं कृत्वा वज्रस्फोटसमं तदा ॥
॥ दुर्निवारसमायातः पार्श्वे तस्य धरापतेः ॥७२॥

नंतर वज्र फुटल्याप्रमाणें मोठा भयंकर शब्द करून तो निवारण करण्यास कठिण असा राक्षस त्या राजाच्या पाठीमागें आला.

६२

॥ नहुषेन महाशक्त्या ताडितो हुंडदानवः ॥
॥ मृतो भुवि पपाताशु वज्राहत इवाचलः ॥६३॥

नहुषानें भयंकर शक्ती त्या हुंडासुराच्या हृदयावर सोडली. तेव्हां ज्या-प्रमाणें वज्रघातामुळें पर्वत कोसळावा त्याप्रमाणें तो असुर भूमीवर ताबडतोब पडला आणि लगेंच मृत झाला.

॥ तदा तु दानवास्सर्वे दुःखितादुर्गमाविशत् ॥
॥ देवाः प्रहर्षभाजग्मुः गंधर्वाः सिद्ध चारणाः ॥६४॥

तेव्हां ते सर्व राक्षस दुःखानें विव्हल होऊन किल्ल्यांत शिरले. सर्व देव, गंधर्व, सिद्धचारण इत्यादिक आनंदित झाले.

॥ सुत उवाच ॥ अत्यंत रूपसौंदर्या तनया शंकरस्यच ॥
॥ गंगातिरं समाश्रित्य यदर्थं तपासि स्थिता ॥६५॥

६२

६३

॥ अशोक सुंदरी नाम्ना रंभयासह हर्षिता ॥
॥ अधिगम्य तं नहुषमिदमाह तपस्विनी ॥ ६६ ॥
॥ उद्वाहयस्व मां वीर कृपया राजसत्तम ॥

सुत म्हणतात:— अतिस्वरूप व सौंदर्यानें युक्त अशी शंकर नामक गंधर्वाची कन्या अशोक सुंदरी नहुष प्राप्तीकरितां तपश्चर्या करीत होती. ती भागीरथीच्या तीरावर आपली सखी जी रंभा तीज बरोबर नहुषा जवळ मोठ्या आनंदानें आली. नंतर ती तपस्विनी त्याला म्हणाली कीं, हे विरोत्तमा नृपश्रेष्ठा, कृपेनें माझे पाणीग्रहण करा.

॥ नहुष उवाच ॥ गुरुणोक्त मुहूर्तेन त्वां वा उद्वाहयाम्यहम ॥६७॥
॥ एव मुक्त्वा सरंभां तां गृहीत्वा राजसत्तमः ॥
॥जगाम रथवर्येण वसिष्ठस्याश्रमं प्रति ॥६८॥

६३

६४

नहुष म्हणाला :- गुरुनें सांगितलेल्या मुहुर्तानें मी तुझे पाणीग्रहण करीन.
असें बोलून त्या नृपश्रेष्ठानें तिला रंभेसह आपल्या निजरथांत घेतली व
तो वसिष्ठ ऋषींच्या आश्रमांत गेला.

॥ वसिष्ठमाश्रमगतं नमस्कृत्य तयासह ॥
॥ यद्यज्जातं तु तत्सर्वं वसिष्ठाय न्यवेदयत् ॥७९॥

वसिष्ठ ऋषींच्या आश्रमांत आल्यावर नहुषानें अशोक सुंदरीसह त्यांना
नमस्कार केला; व जेंजें झालें तें तें सर्व वर्तमान त्यांना सांगितलें.

॥ तिथौ लग्ने शुभे प्राप्ते तयोस्तु मुनी सत्तमः ॥
॥ विवाहं कारयामास ऋषिभिर्ब्रह्मवादिभिः ॥८०॥
॥ आशीर्भिरभिवाद्यैव सभार्यं नहुषं तत्र ॥
॥ पितरं मातरं द्रष्टुं प्रेषयामास सत्वरम् ॥८१॥
॥ स नत्वा द्विजवर्यं जगाम स्वपुरं प्रति ॥

६५

परोक्षापरोक्ष ज्ञानी अशा ऋषींकडून शुभ तिथी व शुभ
लग्नावर वसिष्ठ ऋषींनीं त्या उभयतांचा विवाह केला, व
त्यांना पुष्कळ आशिर्वाद दिले नंतर नहुषास भार्येसह
वर्तमान माता पित्यांचे दर्शन घेण्याकरितां तांबडतोब
पाठविलें. तव्हां तो नहुष त्या ब्राह्मण श्रेष्ठांना नमन करुन
स्वतःचें नगराला गेला.

सूत म्हणतात ॥ अप्सरा मेनका नाम प्रेषिता देवतैस्तदा ॥८२॥
॥ सोवाच राज्ञी त्वत्तः समायातीति सांप्रतम् ॥
॥ सा मेनका वचः श्रुत्वा राजानमिदमब्रवीत ॥८३॥

॥ तव पुत्रः समायाती सेणावादती मेनका ॥
॥ दिव्यां रत्नमयीं मालां मेनकायै ददै नृपः ॥ ८४ ॥

सूत म्हणतात - त्यावेळीं देवांनी मेनका नांवाच्या अप्सरेला इंदुमती राणीकडे पाठविली. तेव्हा ती राणीला म्हणाली हे राज्ञी तुझा पुत्र आतांच येत आहे मेनकेचें हें भाषण ऐकून राणी आयुराजाला म्हणाली महाराज मेनका नामक अप्सरेनें आतां येऊन असें सांगितलें कीं आपला मुलगा आतांच येत आहे ही आनंदाची वार्ता ऐकून राजानें दिव्य रत्नाचा हार मेनकेस बक्षीस दिला.

६६

॥ राजा सभार्यो हर्षेण सत्सदत्तं स्मरन्तदा ॥
॥ महोत्सवं ततश्चक्रे पुत्रस्यागमनं प्रति ॥ ८५ ॥

आयुराजानें व त्याच्या भार्येनें (इंदुमती राणीनें) मोठ्या आनंदानें सत्सदत्ताचें त्यावेळीं स्मरण केलें नंतर आपला मुलगा येणार म्हणून त्यानें मोठा उत्सव आरंभिला.

सर्वोत्तमं सर्व गुणोपपन्नं ॥ आनंदरूपं परमार्थमेकम् ॥
शोकापहं मंगलदं नराणां ॥ श्रीसत्सदत्तं प्रणमामि देवम् ॥ ८६ ॥

सर्व श्रेष्ठ सर्व उत्तम गुणानीं युक्त, केवळ आनंदमय अद्वितीय व परम श्रेष्ठ पद प्राप्त करून देणारा मनुष्यांना कल्याणकारक व शोक नाहींसा करणारा असा जो श्री सत्सदत्त देव त्याला मी नमस्कार करितों, अशी तो स्तुति करूं लागला.

६७

६८

॥ तदा रथेन दिव्येन सह पत्न्या महामतिः ॥
॥ रथयाच सुरैः सार्धं गीतवाद्यस्वरेणच ॥८८॥
॥ नागाह्वय पुरं प्राप सर्व शोभासमन्वितम ॥
तो महा बुद्धिवान नहुष आपल्यां पत्नीस व रंथसद्दिव्य रथांत घेऊन देवगणासह वाजत गाजत मंगल अशा गीत वाद्यांच्या गजरांत मोठ्या देखाव्यानें नाग नांवाच्या नगरांत आला. ॥देवरूपोपमैः पुण्यै पुरुषैः समलंकृतम ॥८९॥
हेमतोरणसंयुक्तं पताकाभिरलंकृतम ॥
नारीभि र्दिव्यरूपाभि र्गजाश्वैः स्यंदनैस्तथा ॥८९॥
नानामंगल शब्दैश्च वेदघोषैः समाकुलम ॥
गीतवादित्र शब्दैश्च वीणा वेणुस्वनैस्ततम ॥९०॥

६८

६९

॥ सर्व शोभासमायुक्तं प्रविवेशपुरोत्तमम ॥
॥ वेद मंगल घोषैश्च ब्राह्मणैरभिनंदितः ॥९१॥
तें नगर देवासारख्या रूपांनीं युक्त धार्मिक अशा पुण्यवान पुरुषाकडून अलंकृत केलेलें सुवर्णाच्या तोरणांनीं व पताकांनीं अलंकृत केलेलें अति सुरूप अशा स्त्रियांनीं सुशोभीत झालेलें नाना तऱ्हेचे रथ व हत्ती, घोडे यांनीं युक्त असलेलें नाना तऱ्हेचे मंगल शब्द व वेद घोष जेथें सुरु आहेत, संगीत वाद्यें व गायनाचें आलाप जेथें निघात आहेत विणा वेणु यांच्या कोमलस्वरानीं जें दुमदुमलेलें आहे अशा सकल ऐश्वर्यसंपन्न उत्तम नगरांत सानें

६९

६०

प्रवेश केला. तेव्हां ब्राह्मणांनी मंगलकारक वेदमंत्रानें त्याला आशीर्वाद दिले.

॥ सपुण्यं पितरं दृष्ट्वा मातरं च सुपुण्यकाम् ॥

॥ हर्षेण महताविष्टः पित्रोः पादौ ननाम सः ॥९२॥

पुण्यवान मातापितरांना पाहून आणि अत्यंत आनंदीत होऊन त्या नहुषानें माता पितरांच्या चरणीं नमस्कार केला.

॥ अशोकसुंदरी सापि तयोः पादौ पुनः पुनः ॥

॥ समालिंग्य सुतं तौ तु हृष्टैःसिषिचतुर्जलैः ॥९३॥

त्या अशोक सुंदरीनें सुद्धां वारंवार त्यांना नमन केलें. त्या उभयता राजा राणींनी आपल्या मुलाला घट्ट आलिंगन देऊन आनंदाश्रूंनीं न्हाऊ घातलें.

६०

६१

॥ अनामयं च नहुषः पप्रच्छ पितरौ प्रति ॥

॥ एवं पृष्टौ च पितरौ सानंद पुलकौ तदा ॥९४

राजा नहुषानें माता पित्यांना कुशल विचारिले मातापितरांना असें विचारले असतां त्यांचे अंगावर रोमांच उभे राहिले व ते म्हणाले. ॥ अद्यैव व्याधयो नष्टा दुःखशोकावुभौ गतौ ॥

॥ भवतो दर्शनान्पुत्र कृतकृत्यौ स्व आस्थितौ ॥९५॥

॥ इत्युक्त्वा पुत्र मालिंग्या जीघ्रतां तस्य तौ शिरः ॥

हे पुत्रा तुझ्या दर्शनामुळें आज सर्व व्याधी नष्ट झाल्या सर्व शोक व दुःख ही नष्ट झाली, आणि त्यामुळें आम्ही कृत कृत्य झालों असें बोलून पुत्राला दृढ आलिंगन देऊन त्या उभयतांनीं त्याच्या टालूचें अवघ्राण केलें

६१

62

सुतउवाच ॥ अथसौ कथयामास पितरौ स्वयमेवमवै ॥९६॥

॥ यद्य ज्जात वृत्तसर्व तथाहरणमात्मनः ॥

॥ पितरौ तत्समाकर्ण्य सतानौ हृष्टमानसौ ॥९७॥

॥ ससदत्तव्रतं तौच विशेषेण प्रचक्रतुः ॥

सुतम्हणतात - नंतर त्या उभयतांनी माता पितरा जवळ येऊन नहु-
षानें त्यावेळीं जेजें झालें ते तें सर्व वर्तमान सांगितलें त्याच प्रमा
णें आपणास हुंडासुरानें कसें पळवून नेलें हे हिं सांगितलें ते
श्रवण करुण आई बापांना अंतःकरणांत फार आनंद झाला
व त्यांनीं विशेष आनंदानें व समारंभानें श्रीससदत्त व्रत केलें

॥ नहुषोधनुरादाय इंद्रस्य स्यंदनेनवै ॥९८॥

62

63

॥ जिगाय पृथिवीं सर्वां सप्तद्विपां सपत्तनां ॥

॥ पित्रोः समर्पयामास वसुपूर्णां वसुंधराम् ॥९९॥

राजा नहुषानें धनुष्य घेऊन इंद्राच्या रथामध्यें बसून सर्व सप्त-
द्विपा पृथ्वी त्यांतील नगरासह जिंकली, ऐश्वर्यपूर्ण अशी ती पृथ्वी
माता पित्यांना अर्पण केली.

॥ पितरौ तोषयन्नित्यं दानधर्मैः सुकर्मभिः ॥

॥ पितरं याजयामास राजसुयादिभिस्तदा ॥१००॥

॥ सर्वैर्यज्ञैश्च दानैश्च व्रतैर्नियमसंयमे ॥

॥ सुसंपूर्णौ कृतौ तौ तु इतरौ चायुसूनुना ॥१॥

63

६४ त्यानें पुष्कळ दानधर्म करुण व श्रेष्ठ कर्मे करुन मातापितांना आनंदीत केलें. राजसुयादी यज्ञ आपल्या पित्यास करावयास लावले. आयुपुत्र नहुषानें माता पितांना सर्व यज्ञांनीं, नियमांनी, दानांनीं व व्रतांनीं पूर्ण कृतकृत्य केलें.

॥ अथ देवाः समागच्छन्ना गाव्हय पुरोत्तम ॥
॥ मुनी भिश्च सुसिद्धैश्च आयुराजो महायशाः ॥२॥
॥ अभिषिच्य स्वराजे तं समेतं शिवकन्यया ॥
॥ भार्या युक्तः स्वकायेन स्वर्गलोकं जगाम सः ॥३॥

नंतर श्रेष्ठ अशा नागनाम नगरांत सर्व देव आले व महान् येशस्वी ६४

६५ आयुराजानें सिद्ध व श्रेष्ठ ऋषी कडून शिव कन्या अशोक सुंदरी सह नहुषास स्वतःचे राज्यावर अभिषेक करुन आपल्या भार्येसह तो स्व शरीरानें स्वर्गलोकी गेला।

॥ ऐंद्रं पदं परित्यज्य देवैः सिद्धैः सुपूजीतः ॥
॥ सुकर्मभिर्महाप्रानीं पुत्रस्यापी सुतेजसः ॥४॥
॥ इन्द्रलोकं गतः पुण्यैं निवसत्येव भूपतिः ॥

स्वर्ग लोकिच्या इंद्रादि देवांना मिळणाऱ्या सुखांचा ज्यानें त्याग केला आहे, सिद्धांनीं व देवांनीं ज्याला वंदन केलें आहे, चांगल्या कर्मांनी प्राप्त झालेल्या व पुत्राच्या तेज प्रभावानें ज्यानें ~~प्राप्त केला आहे~~ ६५

७६ सत्कर्मे केली आहेत, जो महाज्ञानी झाला आहे व जो पुत्राचे प्रश्ना-
वानें युक्त झाला आहे, असा आश्रुराजा पुण्यकर्मामुळें श्री दत्त-
क्षेत्रीं गेला व तेथें वास करूं लागला.

॥ नहुषोऽपि महाराज स्सत्यदत्तस्य वै व्रतम् ॥५॥
॥ पुनः पुनश्चकाराथ सर्वैश्वर्यसमन्वितः ॥
॥ ब्रम्हज्ञानं सुसंपाद्य परमं सुखमापसः ॥६॥

महाराजा नहुषसुद्धां श्रीसत्यदत्ताचें व्रत इकडे वारंवार करूं
लागला. नंतर सर्व ऐश्वर्यांनीं युक्त होऊन व श्रेष्ठ असें ब्रह्म
ज्ञान संपादन करून तो परमसुखी झाला. ७६

॥ एषवः सत्यदत्तस्य व्रतस्य महिमोन्नतः ॥
७७ ॥ कथितोऽहि मया विप्राः किमन्यत्श्रोतुमिच्छथ ॥७॥

अशा प्रकारें श्रेष्ठ अशा श्री सत्यदत्तव्रताच्या महिमा
आम्ही आपणास कथन केला आहे. हे तपषि हो आणखी
काय श्रवण करण्याची तुमची इच्छा आहे असें सूतांनीं
शौनकादि ऋषींस विचारलें.

श्री लक्ष्मीनारायण संवादांतील सत्यदत्त कथेचा
तिसरा अध्याय संपूर्ण झाला.

ऋषय ऊचु ॥ सत्यदत्तकथां सूत पुनर्ब्रूहि जगद्धिताम् ॥
॥ वर्धतेऽत्र मतिर्भूयः श्रवणेऽस्माकमादरः ॥१॥ ७७

७८

ऋषी ह्मणतात हे सूता, सत्यदत्ताची कथा जगाचे हिता करितां तूं आह्मांस आणखी सांग, ती ऐकण्याची आह्मांस फार इच्छा आहे. आम्ही ती मोठ्या आदरानें ऐकूं.

सूतउवाच ॥पुनरन्यत्प्रवक्ष्यामि शृण्वंतु मुनिपुंगवाः ॥

॥ सरस्वती शिवा भद्रा कुंभी भोगावतीतथा॥२॥

॥ एतासां कृष्णवेण्याश्च संगमे पुण्यकारके ॥

॥ तत्रामरपुरक्षेत्रे सुकलो नामवैश्यकः ॥ ३॥

सूत ह्मणाले हे ऋषिश्रेष्ठ हो, मी तुह्मांस आणखी कथा सांगतों त्या तुह्मी ऐका. सरस्वती शिवा भद्रा कुंभी व भोगावती या पाच नद्यांचे संगमानें झालेली पंचगंगा नदी तिचा

७८

७९

आणि वेण्यानदीसह कृष्णानदी[illegible]च्या संगम जेथें झाला आहे त्या ठिकाणीं अमरपूर ह्मणून क्षेत्र आहे त्यास हल्लीं श्रीनरसिंह वाडी ह्मणतात. तेथें सुकल नावाचा वैश्य राहत होता.

॥ दत्तपूजारतो नित्यं महादारिद्र्यपीडितः ॥

॥ यथाशक्तिच भक्त्याच सदाविप्रान पूजयत ॥ ४॥

तो अत्यंत दरिद्री होता. तरी नित्य दत्ताची पूजा अर्चा करीत असें व यथाशक्ति व मोठ्या भक्तीनें नेहमी ब्राह्मणाचे पूजन अर्चन करीत असे.

॥ एकदा तद्गृहे काश्चित्सर्वज्ञो ब्राह्मणो [illegible] तमः ॥

॥ तीर्थयात्राप्रसंगेन दत्तं स्मृत्वागतः स्वयम् ॥ ५॥

७९

८०

एकदां कोणी एक त्रिकालज्ञान असलेला ब्राह्मण तीर्थयात्रे-च्या निमित्तानें दत्तप्रभूचें स्मरण करित आपण होऊन त्याचे घरीं आला.

॥ वैश्यः प्रणम्य तद्भक्त्या प्रणामं कृतवान्मुदा ॥
॥ ततः स ब्राह्मणः श्रेष्ठ समुवाच दयान्वितः ॥ ६ ॥

त्यावेळीं त्या वैश्यानें मोठ्या आदरानें त्या ब्राह्मणास नमस्कार केला त्यायोगें तो ब्राह्मण कृपाळू होऊन त्यांस म्हणाला

॥ हे वैश्य सत्यदत्तस्य व्रतं कुरु यथाविधि ॥
॥ तेन व्रतेन सर्वेष्टं तव शीघ्रं भविष्यति ॥ ७ ॥
॥ इत्युक्त्वा स जगामाशु तत्रस्तीर्थांतरं द्विजः ॥

८०

८१

हे वैश्या सत्यदत्त व्रत तूं विधीपूर्वक कर म्हणजे त्या व्रताच्या योगे तुझें सर्व इच्छित मनोरथ त्वरित पुरें होतील. या प्रमाणें भाषण करुन तो द्विजश्रेष्ठ दुसऱ्या तीर्थास लगें-च गेला. ॥ अथामरपुरे वैश्यः सत्यदत्तस्य च व्रतम् ॥ ८ ॥

॥ चक्रे श्रद्धायुतो भक्त्या यथाशक्ति यथाविधि ॥
॥ प्रसादं जगृहे भक्त्या भार्यापुत्रादिभिर्युतः ॥ ९ ॥

नंतर अमरापुरामध्यें त्या वैश्यानें सत्यदत्त व्रत यथाशक्ती व विधीपूर्वक मोठ्या श्रद्धेनें केलें व भार्या व पुत्रादि सहवर्तमान प्रसाद ग्रहण केला.

८१

८२

॥ तद् व्रतस्य प्रभावेण खंड लक्ष्मी विराजितः ॥
॥ पुत्रैः पौत्रैश्च संयुक्तो धनधान्यसमृद्धिमान् ॥१०॥

त्या व्रताचे प्रभावानें त्याचें घरीं अखंड लक्ष्मी राहिली त्याला मुलगे व नातू झाले व धनधान्याची समृद्धि त्याचें घरांत झाली

॥ सर्वैश्वर्यसमायुक्तो जाति श्रेष्ठो बभूव ह ॥
॥ पुनः पुनश्चकारासौ सत्यदत्तस्य वै व्रतम् ॥११॥

तो वैश्य सर्व ऐश्वर्यानें युक्त होऊन आपल्या जातीमध्यें श्रेष्ठ झाला व त्यानें हें सत्यदत्तव्रत वरचेवर केलें.

॥ दत्तादींश्च सुखं पूज्य ज्ञानं प्राप्य गुरूक्तिभिः ॥
॥ इह सर्व सुखं भुक्त्वा चांते दत्तपुरं ययौ ॥१२॥

८२

८३

दत्तप्रभूंची व ब्राह्मणांची यथाविधी पूजा करून दत्तगुरु चे आशीर्वचनामुळें त्यास ज्ञान झालें व इहलोकाची सर्व सुखें मिळून तो शेवटी दत्तस्थानास म्हणजे मोक्षास गेला.

॥ तं दृष्ट्वा कतिचित् शूद्राः भक्त्याचक्रुश्च तत् व्रतम् ॥
॥ तेऽपि सर्वे वांछितार्थं पूर्ववत्प्रापुरंजसा ॥१३॥

त्या वैश्यानें आचारिलेलें सत्यदत्त व्रत पाहून कित्येक शूद्रांनीं भक्तिनें तें व्रत केलें व त्यासही पूर्वीं सांगितल्या प्रमाणें सर्व धन प्राप्त होऊन त्यांचे मनोरथ त्वरित पूर्ण झाले.

८३

८४

॥ अन्येपि रथकाराद्याः श्रद्धाभक्तियुतानराः ॥
॥ तद्व्रतं च सुसत्कृत्या सर्वैः प्राप्ता पुरं जसा ॥१४॥

तसेंच दुसरे रथकार वगैरे शिल्प कारागीर यानींही मोठ्या श्रद्धेनें व भक्तिनें हे व्रत केलें व त्यानाही सर्व सुखें सत्वर प्राप्त झाली.

॥ इत्थं श्रीसत्यदत्तस्य व्रतं सर्वेष्टदायकम् ॥
॥ विख्यातं सर्व लोकेषु सम्भून्मुनिसत्तमाः ॥१५॥

हे मुनि वर्यानों याप्रमाणें हें सत्यदत्ताचे व्रत सर्व मनोरथ पुर्ण करणारें आहे असें तिन्ही लोकात प्रसिद्ध झालें

श्री लक्ष्मी नारायणसंवादातील सत्यदत्तकथेंचा चौथा अध्याय संपूर्ण झाला. (४) अध्याय

८४

८५

सूत उवाच ॥ पुनरन्यत्प्रवक्ष्यामी सत्यदत्त व्रतस्य वै ॥
॥ चरितं परमाश्चर्यं श्रृण्वंतु मुनिसत्तमाः ॥१॥

सूत म्हणतात - हे मुनि श्रेष्ठ हो, मी तुम्हांस आणखी सत्यदत्त व्रताची कथा सांगतो. ती फार आश्चर्य कारक आहे ती तुम्ही श्रवण करा.

एकदा ब्राह्मण श्रेष्ठाः श्रीकृष्णायाः शुभे तटे ॥
औदुंबरस्य वृक्षस्य मूलमाश्रित्य संस्थितम् ॥२॥
दत्तात्रेय मुनिं द्रष्टुमागमन्भक्ति संयुताः ॥
तं संदृश्य प्रणेमुस्ते तुष्टुवश्च पुनःपुनः ॥३॥

८५

एकदां कृष्णा नदीचें पवित्र काठीं औदुंबर वृक्षाखालीं

प्रसविलेल्या दत्तात्रेय मुनींद्रांना पाहाण्याकरितां भक्तियुक्त अंतःकरण झालेलें असें विद्वान ब्राम्हण आले त्यांनी श्रीदत्तात्रेय मुनींना पाहून वरचेवर प्रणाम केलें व सर्वांनी त्यांची स्तुति केली. ॥ तत्रैव सप्तदत्तस्य व्रतं चक्रुः समागताः ॥

॥ सप्तदत्तं सुसंपूज्य प्रसादं समभुंजत ॥ ४ ॥

त्या सर्वांनी त्याच ठिकाणीं सप्तदत्त व्रत केलें सप्तदत्ताची यथाविधि पूजा केली व प्रसाद ग्रहण केला.

॥ तत्पूजादर्शनार्थं च बहवोन्ये समागताः ॥

॥ पूजां दृष्ट्वा च ये भक्त्या प्रसादं जगृहुर्मुदा ॥ ५ ॥

॥ तन्मध्ये च नराः केचिद्वांछितार्थमवाप्नुवन ॥

॥ मुमुक्षवो ज्ञानवांश्च चिरान्मोक्षमवाप्नुवन ॥ ६ ॥

॥ ब्रह्मज्ञानेच्छवो ज्ञानं नराः प्रापुश्च सत्वरम

॥ रोगमुक्ताश्च रोगार्ताः समभूवन्सदैव हि ॥ ७ ॥

ती पूजा पाहण्यास पुष्कळ लोक जमले होते. ज्यांनी भक्तीनें पूजा पाहून आनंदानें प्रसाद ग्रहण केला त्यापैकीं कांहीं पुरुषांना इच्छित फल मिळलें मुमुक्षु नरांना मोक्षप्राप्ति झाली, ब्रह्मज्ञानाची इच्छा करणारास ज्ञान प्राप्ति त्वरित झाली रोगानें जे पीडीत होते ते रोगमुक्त होऊन त्यांना सदैव आरोग्य प्राप्त झालें.

॥ दारिद्र्यपीडिताः केचित्प्रचुरं धनमाप्नुवन ॥

॥ पिशाचोपद्रवात्केचिन्मुक्ताश्च सुखिनोऽभवन ॥ ८ ॥

~~वंध्य[illegible] च्यान्व भवं मूलं पुत्रादिषु यथा[illegible]~~

॥ काश्चिच्च योषितां वंध्याः पुत्रान्प्रापुश्च सत्वरम् ॥
॥ इत्यादिसुखजातंच तेषां समभवत्ततः ॥ ९ ॥

जे कोणी दारिद्र्यानें पीडित होते ते श्रीमान झालें, ज्यांना पिशाच्च बाधा होती ते त्यांतून मुक्त होऊन कायमचे सुखी झाले, कांहीं स्त्रिया वंध्या होत्या त्यांना पुत्र प्राप्ती लगेच झाली. अशाप्रकारें निरनिराळ्या प्रकारची इच्छा करणाऱ्या लोकांचे सर्व मनोरथ पूर्ण झाले.

॥ ये प्रसाद मनादृत्य समागच्छन्स्वमालयाम् ॥
॥ ते केचित्पंगवो जाता मूका अंधास्तथापरे ॥१०॥
~~॥ केचित्तेतु मुर्च्छितांश्च मृतकल्पा~~

॥ केचिच्चान्वभवं शूलं कुक्ष्यादिषु यथायथम् ॥
॥ केचित्तेतु मुर्च्छितांश्च मृतकल्पा स्तथैवहि ॥११॥

ज्यांनीं प्रसादाचा अनादर करून प्रसाद घेतला नाहीं व तसेंच घरीं गेलें त्यापैकीं कांहीं लंगडे झालें. कोणी मुके झाले तर कोणी आंधळें झालें, कित्येकांना पोट शुळाची व्यथा जडली व कित्येक मुर्च्छित झाले व प्रेतवत पडले ज्यांच्या त्यांच्या अपराधाप्रमाणें त्यास ती ती व्याधी जडली.

९०

॥ एवं दुःखान्वितः सर्वे बभ्रुकुरधमानराः ॥
॥ तत्तत्संबंधिनः सर्वे विचारं चक्रिर ततः ॥७२॥

अशा तऱ्हेनें सर्वांना नानारोग होऊन ते अधम लोक दुःखानें त्रास झालें सावेळीं यांच्या यांच्या आप्त इष्टांनीं विचार केलाकीं, असे होण्याचें कारण काय?

॥ सत्यक्त प्रसादस्य सा गंधेदम जापत ॥
॥ इत्थं निश्चित्य मनसि वृक्षमौदुंबरं प्रति ॥७३॥
॥ तां [illegible] होत्वा समागत्य सत्यक्तस्य पूजनम् ॥
॥ सम्यक कृत्वा प्रसादं ते जगृहुर्भक्तिसंयुतः ॥७४॥

९२

सत्यदत्ताचें प्रसादाचा अव्हेर करून त्याग केला त्यामुळें सर्वांस ह्या आधी जडल्या असा निश्चय मनामध्यें करून त्या सर्वांना औदुंबर वृक्षाखालीं ते घेऊन जाऊन तेथें सत्यदत्ताचें यथाविधी पूजन करून सर्वांनीं भक्तियुक्त अंतःकरणानें प्रसाद ग्रहण केला

॥ प्रसादम् पार द्विष्यो दत्वा तैः सहिता नराः ॥
॥ हर्षयामा सुरसंतं सत्यदत्तं दयानिधीम् ॥७५॥
॥ क्षमस्व [illegible] चैषामनांसि उन्मादेन कृतानिवै ॥
॥ प्रमादमेषु सर्वेषु त्वं कुरुष्व दयानिधे ॥७६॥

दुसम्यानाही प्रसाद दिला व त्या सर्वांना आनंदित केलें नंतर कृपाळू अशा सत्यदत्ताला अत्यंत प्रसन्न व प्रार्थना केली कीं,

९२

९३

"हें प्रभो ! यांनीं उन्मत्त होऊन अविचारी पणानें प्रसादाचा त्याग केला तरी अतां त्यांना क्षमा करावी. आपण कृपेचें सागर आहां. तेव्हां आतां कृपाळू होऊन ह्यांची आधि हरण करा."

॥ इति संप्रार्थ्य देवेशं दध्युः सर्वे मुहुर्मुहुः ॥
॥ ततो दत्त प्रसादेन पुर्ववत्सुखिनोऽभवन् ॥७७॥

अशा प्रकारें प्रभूंची प्रार्थना करून सर्व जनांनीं वारंवार ध्यान केलें. नंतर दत्ताचें कृपेनें सर्वांना पूर्ववत सुख प्राप्त झालें.

॥ इह सर्व सुखं भुक्त्वा चांते दत्तपुरं ययुः ॥
॥ सदा विष्णवादि देवेभ्यो दत्तात्रेयोधिकस्मृतः ॥७८॥

इह लोकीं सर्व सुखें भोगून शेवटी मोक्षही त्यांना मिळाला. नेहमी विष्णू आदिकरून देवापेक्षा दत्तात्रेयांचीच उपासना जास्त करावी.

९३

१४

॥ अतस्तत्सेवनं शीघ्रं वांछितार्थस्य साधकम् ॥
॥ ततोपि सत्यदत्तोवै उत्तमः परिकीर्तितः ॥ १९ ॥
कारण त्यांचें पुजन केलें असतां सर्व मनोरथ त्वरीत पूर्ण होतात.
त्यामध्येंही सत्यदत्ताची आराधना श्रेष्ठ सांगितली आहे.
॥ तस्य पूजा वांछितार्थमतिशीघ्रं प्रयच्छति ॥
॥ सत्यनारायणादिभ्यस्तथा चंडि विनायकात् ॥ २० ॥
॥ उत्तमः कीर्तितः सद्भिर्दत्तात्रेयो कलौयुगे ॥
॥ ततोपि सत्यदत्तश्च उत्तमः परिकीर्तितः ॥ २१ ॥

१४

१५

कारण त्यांचें पूजनानें इच्छित मनोरथ अत्यंत त्वरितप्राप्त होतात. सत्यनारायण, सत्यचंडी व सत्यविनायकादि व्रतापेक्षां सत्यदत्तव्रत उत्तम आहे असें सत्पुरुष म्हणतात कारण कलियुगांत दत्तात्रेयांचीच आराधना करावी असें सांगितले आहे.
म्हणून सत्यदत्त व्रतच उत्तम आहे.

॥ अतस्तत्पूजनें शीघ्रमतिशीघ्रफलप्रदे ॥
॥ अतश्च सत्यदत्तस्य पूजनं सुखमीप्सुभिः ॥ २२ ॥
॥ अवश्यं तु प्रकर्तव्यं यथाशक्ति यथाविधी ॥
त्यांचें पुजनानें अत्यंत त्वरीत फळ मिळतें म्हणून सुखाची इच्छा करणारानें सत्यदत्ताचें पूजन यथाशक्ती व विधी पूर्वक मुद्दाम करावें.

१५

९६

॥ यः कुर्यात्सत्यदत्तस्य व्रतं परमपुण्यदम् ॥२३॥
॥ शृणुयात्तत्कथां पुण्यां श्रद्धाभक्तियुतो नरः ॥
॥ वांछितार्थं तस्य सिद्धेत् सत्यदत्त प्रसादतः ॥२४॥
॥ यात्यन्ते दत्तपुरमिह सर्व सुखान्वितः ॥

जो अतिपुण्यप्रद अशा सत्यदत्तव्रताच्यें पूजन करतो व त्यांची कथा भक्तियुक्त अंतःकरणानें ऐकतो त्याला सत्यदत्ताचें प्रसादानें इच्छीत फल प्राप्ती होते. शेवटीं दत्तस्थान म्ह०जे मोक्ष मिळतो व अखंड सुख प्राप्त होते.

॥ सूत उवाच ॥ माहात्म्यं सत्यदत्तस्य यथाशक्त्यनुवर्णितम् ॥२५॥
॥ प्रसादं दत्तभक्ताः हि कुर्वंतो मुन योमयि ॥

सूत म्हणतातः— सत्य दत्ताचें महात्म मी यथा शक्ती वर्णन केलें आहे तरी हे दत्त भक्त मुनीनों माझ्यावर अनुग्रह करा.

९७

॥ मुनय ऊचुः ॥ हे सूत सत्यदत्तस्य माहात्म्यं परमोत्तमम् ॥२६॥
॥ संस्मृत्य कृतकृत्याश्च सानंदाः स्मो वयं सदा ॥

मुनी म्हणाले हे सूता, सत्य दत्ताचे अति उत्तम कथानक तूं आम्हांस सांगितलेंस त्यायोगें आम्हीं कृत कृत्य झालों व आम्हास फार आनंद झाला

॥ नारायणोवाच ॥ हे प्रिये सत्य दत्तस्य व्रतं वै वांछितार्थदम् ॥२७॥
॥ मयाते कथिता देवी गुह्यंच परमोत्तमम् ॥

नारायण म्हणतातः— हे प्रिये इच्छीत फळ देणारें सत्यदत्ताचें व्रत अत्यंत गुह्य व उत्कृष्ट आहे. तें मी तुला निवेदन केले आहे.

॥ इत्युक्त्वा श्री जगन्नाथः सानंदोऽभूद्रमापतिः ॥२८॥

असें बोलून जगत्पालक रमापती हर्ष युक्त झाले.

॥ रमोवाच ॥ भगवन्सर्व लोकेश श्रुत्वा परमं हे तव ॥
॥ सत्य दत्तव्रतं श्रुत्वा कृतकृत्यास्मि मानद ॥२९॥

॥ इसत्वा श्रीहरीपद्मा सानंदा तद्व्रतस्य हि ॥
॥ प्रकाशं कारयामास सर्वदा ऋषिसत्तमैः ॥ ३० ॥
॥ तस्मात् ज्ञानजनान् श्रुत्वा सानंदाभूद्रमास्तदा ॥
रमा म्हणाली- हे भगवान त्रैलोक्यनाथा मान्यवरा, तुमची कृपा माझ्यावर आहे असें मी जाणतें तुम्ही मला सत्यदत्त व्रत सांगितलें तें श्रवण करुन मी कृतकृत्य झालें आनंदित होत्साती लक्ष्मीदेवी श्रीहरी ला असें म्हणाल्यावर तिजें तसें वर्णी करुन हें व्रत सर्व जगाला प्रगट केलें त्याचें फल सर्वांस मिळतें आहे असें पाहून रमा संतुष्ट झाली व्यास उवाच ॥ अनंत गुणसंयुक्तः सत्यदेवो दयानिधिः ॥
॥ सर्वेषां च तनुयात सुधा दृष्ट्या च सर्वदा ॥ ३१ ॥
व्यास म्हणतात- हा सत्यदेव अनंत गुणांनीं युक्त असून कृपेचा

सागर आहे. आपल्या अमृतपूर्ण दृष्टीच्या योगे त्यानें सर्वांचें कल्याण करावें. अशा प्रकारें पुराण समुच्चय सारोद्धारांतील श्री लक्ष्मी नारायण संवादातील श्रीसत्यदत्त कथेचा पांचवा अध्याय संपूर्ण झाला व कथाहि संपूर्ण झाली.

(पंचमोध्यायः)

900

900

[OrderDescription]
,CREATED=13.09.19 16:46
,TRANSFERRED=2019/09/13 at 17:00:29
,PAGES=55
,TYPE=STD
,NAME=S0001791
,Book Name=M-2233-SHRI SATYADAL KATHA
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF

FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,